* नागपूर *
* वर्ष ५४ * अंक २२२ *
मंगळवार, दिनांक १९ नोव्हेंबर २०२४
किंमत रु. २/- + वितरण खर्च रु. १/-
एकूण किंमत रु. ३/-
पुरवणीसह पाने ८

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com



# राष्ट्र-महाराष्ट्र
## आपलं सरकार
# प्रत्येक वचन करु साकार

स्थिर आणि मजबूत सरकारमुळे होईल सक्षम आणि समृद्ध महाराष्ट्राची निर्मिती



भाजप-महायुती आहे, तर गती आहे

महाराष्ट्राची प्रगती आहे

शिवसेना

भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र

महायुतीला मतदान करा आणि विजयी करा

*Matter related to "Clock" symbol of the NCP is sub-judice in the Supreme Court.

Published By: Bharatiya Janata Party, Maharashtra | C.D.O Barrack No. 1, Nariman Point, Mumbai- 400020

विधानसभेच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्ही आघाडीचे नेते पश्चिम महाराष्ट्रामध्ये मोठ्या सभा घेत आहेत; परंतु बंडखोर उमेदवार (महाविकास आघाडीचे १८ आणि महायुतीचे १६) ३६ जागांवर खेळ बिघडवू शकतात. त्यामुळे दोन्ही आघाड्यांच्या अधिकृत उमेदवारांचे नुकसान होण्याचा धोका आहे.

# बंडोबा पश्चिम महाराष्ट्रात बिघडवणार खेळ



**रण तापले**

पश्चिम महाराष्ट्रामध्ये साखर कारखानदारी आहे. त्यातून साखर कारखानदारांनी स्वतःची संस्थाने केली आहेत. त्या प्रत्येकाला विधानसभेत जायचे आहे. जागा कमी आणि इच्छुकांची संख्या जास्त. त्यामुळे इतके पक्ष असूनही या सर्वांना उमेदवारी देता आली नाही. त्यामुळे त्यांनी बंड केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बंडखोरांची उपस्थिती सर्वाधिक असलेल्या दोन जिल्ह्यांमध्ये सभा घेतल्या. पुण्यातून दहा बंडखोर उमेदवार रिंगणात आहेत आणि सोलापूर इथून आठ बंडखोर उमेदवार रिंगणात आहेत. शिर्डीमध्ये भारतीय जनता पक्षाचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना काँग्रेसच्या प्रभावती घोगरे यांच्याशीच नव्हे, तर त्यांच्याच पक्षाचे (भाजप) बंडखोर उमेदवार डॉ. राजेंद्र पिपाडा यांच्याशीही स्पर्धा आहे. अर्थात ही बंडखोरी विखे यांच्या पथ्थ्यावर पडण्याची शक्यता आहे. एकास एक लढत झाली असती आणि कोपरगावातून विवेक कोल्हे यांची मदत झाली असती, तर विखे यांना निवडून येणे अवघड झाले असते. आता डॉ. पिपाडा यांच्या उमेदवारीने विखे यांच्या विरोधकांच्या मतांचीच विभागणी होणार आहे. जतमध्ये भाजपचे गोपीचंद पडळकर यांना काँग्रेसचे विक्रमसिंह सावंतच नव्हे, तर त्यांच्याच पक्षाचे (भाजप) बंडखोर उमेदवार तम्मन गौंडा पाटील यांच्याशीही स्पर्धा आहे. वाईमध्ये शिवसेनेचे पुरुषोत्तम जाधव हे आता अपक्ष म्हणून निवडणूक लढवत आहेत, तर राष्ट्रवादीचे मकरंद पाटील आणि समाजवादी पक्षाचे पिसाळ यांच्यात लढत आहे. सोलापूर उत्तरमध्ये भाजपच्या माजी नगराध्यक्ष शोभा बनशेट्टी, विजयकुमार देशमुख यांच्या विरोधात लढत आहेत. तिथल्या लिंगायत मतांतील फुटीचा फटका देशमुख यांना बसू शकतो. पुरंदरमध्ये (पुणे जिल्हा) राष्ट्रवादीचे बंडखोर आणि माजी नोकरशहा संभाजी झेंडे हे शिवसेना नेते विजय शिवतारे यांच्या विरोधात लढत आहेत. इथे काँग्रेसचे आमदार संजय जगताप लढतीत आहेत.

महायुतीपेक्षाही महाविकास आघाडीत जास्त बंडखोर आहेत. सांगलीत वसंतदादा पाटील कुटुंबातील जयश्री पाटील या काँग्रेसच्या पृथ्वीराज पाटील यांना आव्हान देत आहेत. सांगोल्यात शिवसेनेचे दीपक आबा साळुंखे हे शेतकरी कामगार पक्षाचे डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या विरोधात लढत आहेत. तिथे महायुतीची उमेदवारी शिंदे गटाच्या झाडी, डोंगरफेम शहाजीबापू पाटील यांना आहे. पंढरपूरमध्ये काँग्रेसच्या भगीरथ भालके यांनी बंड केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अनिल सावंत इथून निवडणुकीच्या रिंगणात असून भाजपच्या समाधान अवताडे यांचा मार्ग त्यामुळे सोपा झाला आहे. श्रीगोंदे विधानसभा मतदारसंघातून राहुल जगताप, अण्णासाहेब शेलार, पारनेरमध्ये संदेश कार्ले, विजय औटी, शेवगाव-पाथर्डीमध्ये चंद्रशेखर घुले, हर्षदा काकडे, अकोले विधानसभा मतदारसंघातून वैभव पिचड यांनी बंडखोरी केली असून, श्रीरामपूरमधून तर महायुतीने येथे मैत्रीपूर्ण लढत केली आहे. असेच प्रकार सातारा, सांगली जिल्ह्यातही आहेत. या निवडणुकीत उमेदवारी करू इच्छिणाऱ्या उमेदवारासाठी किमान सहा प्रमुख पक्ष पर्याय उपलब्ध आहेत. किमान दहा हजार मते मिळवणारा बंडखोर त्या विशिष्ट मतदारसंघातील निवडणुकीचा निकाल बदलू शकतो. भाजप, शिंदे गटाने तसेच काँग्रेस आणि शिवसेनेने बंडखोरांवर कारवाई केली असली, तरी अन्य पक्षांनी तशी ती केली नाही. यंदा बंडखोर उमेदवारांच्या प्रभावामुळे पश्चिम महाराष्ट्रातील समतोल लक्षणीय बदलू शकतो.

■■■

माढा मतदारसंघ विधानसभा निवडणूक लोकसभा निवडणुकीप्रमाणेच गाजत आहे. या मतदारसंघाचे तब्बल सहा वेळा प्रतिनिधित्व करणारे बबनराव शिंदे यांचे पुत्र रणजितसिंह शिंदे यंदा अपक्ष म्हणून रिंगणात आहेत. त्यांच्यासमोर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षातर्फे पंढरपूर येथील विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील आणि अजित पवार पक्षाच्या मीनल साठे रिंगणात आहेत. ही लढत दोन्ही राष्ट्रवादी आणि एक अपक्ष अशी असली, तरी यातील प्रतिष्ठा, अस्तित्व आणि वर्चस्वाची लढाई मात्र बबनराव शिंदे आणि मोहिते पाटील यांच्यामध्ये आहे.

# मोहिते पाटील, शिंदेंची प्रतिष्ठा पणाला



अभिजीत पाटील | रणजितसिंह शिंदे | मीनल साठे

**लढाई रंगली**

विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजीत पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तिकीट मिळविण्यात यशस्वी झाले आहेत. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते -पाटील आणि खासदार धैर्यशील मोहिते -पाटील, टेंभुर्णीचे संजय कोकाटे हे त्यांच्या प्रचारात सक्रिय झाले आहेत. अरणच्या भारत शिंदे यांना आपल्या गोटात खेचण्यात अभिजीत पाटील यांना यश आले आहे. पाटील यांच्या प्रचारासाठी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी उपळाई बुद्रुकमध्ये तर खासदार अमोल कोल्हे यांनी करकंबमध्ये प्रचारसभा घेतली आहे. आमदार शिंदे यांनी तीस वर्षांमध्ये अपेक्षित विकासकामे केली नसल्याचा आरोप पाटील हे प्रचारादरम्यान करत आहेत. विठ्ठल कारखान्याच्या माध्यमातून जाहीर केलेला ऊस दर आणि मतदारसंघाच्या विकासासाठी करावयाची कामे याबाबतचे मुद्दे घेत प्रचार करत आहेत. महायुतीच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार माढ्याच्या नगराध्यक्ष मीनल साठे यांच्या रुपाने पहिल्यांदाच माढा विधानसभा मतदारसंघामध्ये संघात महिलेला संधी मिळाली आहे. त्यांच्या प्रचारासाठी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, महिला प्रदेशाध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी टेंभुर्णीत प्रचारसभा घेतली. साठे घराण्याचा राजकीय वारसा, माढा नगरपंचायतीच्या माध्यमातून निर्माण केलेला माढ्याचा विकास पॅटर्न संपूर्ण मतदारसंघामध्ये नेण्याचा मानस आहे. आमदार शिंदे यांनी तीस वर्षांमध्ये केलेल्या विकासाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करीत आहेत. कल्याण काळे, संत कुर्मदास कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे, कनिष्का साठे त्यांच्या प्रचारात आहेत. त्यांच्या काही निष्ठावंत कार्यकर्त्यांनी ऐन कसोटीच्या काळात त्यांची साथ सोडली असली, तरी भारतीय जनता पक्षाचे आणि महायुतीचे पदाधिकारी त्यांच्या प्रचारात सक्रिय झाले आहेत.

या मतदारसंघामध्ये प्रमुख उमेदवारांबरोबरच अभिजीत आण्णासाहेब पाटील (अपक्ष), अभिजीत तुळशीराम पाटील (अपक्ष), ॲड. तुकाराम बळिराम राऊत (अपक्ष), मयुर अजिनाथ काळे (अपक्ष), महेश बाळू बिस्किटे (अपक्ष), रणजीत भैय्या शिंदे (अपक्ष), राजेश तानाजी खरे (अपक्ष), सीताराम विठ्ठल रणदिवे (अपक्ष) यांचाही प्रचार मतदारसंघामध्ये कमी अधिक प्रमाणात सुरू आहे. माढा विधानसभेसाठी अभिजीत पाटील नावाचे चार तर रणजीत शिंदे नावाचे दोन उमेदवार आहेत. या नाम साधर्म्यमुळे आणि पिपाणी चिन्हामुळे पडणाऱ्या मतांचा फटका लढतीतील उमेदवारांना बसण्याची शक्यता आहे. बबनराव शिंदे हे जरी निवडणूक लढवत नसले, तरी त्यांच्याकडे सहा निवडणुका लढवण्याचा अनुभव आहे. अनेक गावांमध्ये विकासकामांबरोबर त्यांचा दांडगा संपर्क आहे. त्यामुळे शिंदेंपुढे आव्हान उभे करणे तसे सोपे नाही. यंदा अनेक जण शरद पवार पक्षातर्फे उमेदवारीसाठी इच्छुक होते. आमदार शिंदे यांनीदेखील पवारांची भेट घेतली; मात्र शरद पवार पक्षाच्या नेत्यांनी शिंदे यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. अभिजीत पाटील यांनी लोकसभेच्या वेळी मोहिते-पाटील यांचा प्रचार थांबवून फडणवीस यांना मदत केली; मात्र विधानसभा निवडणुकी वेळी त्यांनी पुन्हा पक्ष बदल करत आघाडीची साथ पकडली आहे. शिस्तबद्ध प्रचार यंत्रणा आणि मोहिते-पाटील यांची साथ या पाटील यांच्या जमेच्या बाजू आहेत. मीनल साठे या मूळच्या काँग्रेस पक्षाच्या. त्यांच्या घराण्याचाही तालुक्यातील अनेक गावांवर प्रभाव आहे. त्यामुळे साठे काँग्रेस आणि त्यांच्या संपर्कातील नेमकी कुणाच्या हिश्शाची मते घेणार, यावरही निकालाचे गणित अवलंबून आहे. शिंदे-पाटील तुल्यबळ लढत, त्याला असलेला हा साठे यांचा तिसरा कोन या साऱ्यांमुळे माढ्याचा निकाल हा उत्सुकतेचा बनला आहे.

■■■

पारनेर-नगर विधानसभा मतदारासंघामध्ये १२ उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. खरी लढत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांमध्येच होणार आहे; मात्र अपक्ष उमेदवारांची संख्या अधिक असल्याने निवडणुकीमध्ये मोठी चुरस निर्माण होणार आहे. अपक्ष उमेदवार कोणाला तारणार अन् कोणाला पाडणार, हे मात्र निकालानंतरच समजणार आहे.

# मतविभागणी कुणाच्या पथ्यावर?



पारनेर विधानसभेसाठी २१ उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले होते. अर्ज छाननीच्या दिवशी शंकरप्रसाद गंधे यांचा अर्ज अवैध ठरला होता. त्यामुळे २० उमेदवार निवडणूक रिंगणात राहिले होते. शेवटी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी आठ उमेदवारांनी आपले उमेवारी अर्ज मागे घेतल्याने निवडणूक रिंगणात बारा उमेदवार राहिले आहेत. ते आपले नशीब आजमावत आहेत. पारनेर विधानसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या उमेदवार राणी लंके आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्यातच खरी लढत होत आहे. अपक्ष उमेदवार माजी आमदार विजय भास्कर औटी आणि माजी नगराध्यक्ष विजय सदाशिव औटी, तसेच शिवसेनेचे संदेश कार्ले यांच्यामुळे निवडणुकीमध्ये मोठी चुरस निर्माण झाली आहे. अपक्ष उमेदवार दोन्ही विजय औटी आणि संदेश कार्ले हे किती मते घेणार, त्याचा परिणाम कोणाला भोगावा लागणार, हे आताच सांगणे कठीण आहे. यापूर्वी लोकसभेच्या वेळी खासदार नीलेश लंके यांच्या सोबत असलेले कार्ले आता लंके यांच्या विरोधात आहेत, तसेच ते अहिल्यानगर तालुक्यातील आहेत. पारनेर विधानसभा मतदारसंघात अहिल्यानगरचे दोन जिल्हा परिषद गट आहेत. त्यामुळे हे मतदार स्थानिक उमेदवार या नात्याने कार्ले यांच्याकडे काही अंशी झुकल्याशिवाय राहणार नाहीत. त्यामुळे त्याचा मोठा फटका लंके यांनाच बसणार असल्याची चर्चा आहे. असे असले, तरी राणे लंके यांचे माहेर ही कार्ले यांच्या गावाशेजारीच आहे. त्यामुळे आपली लेक आमदार होणार असल्याच्या भावनेने या गटातील काही मते लंके यांना मिळू शकतात.

दोन्ही विजय औटी यांच्या उमेदवारीचा फटका लंके यांच्यापेक्षा दाते यांना अधिक बसेल. कारण लोकसभेच्या वेळी लंके यांच्या विरोधात दाते आणि विजय सदाशिव औटी या दोघांनीही काम केले होते, तसेच माजी आमदार औटी हेही लंके यांच्या सोबत नव्हते. त्यामुळे या दोघांच्या अपक्ष उमेदवारीचा फटका हा लंके यांच्यापेक्षा दाते यांनाच अधिक बसण्याची शक्यता आहे. दाते यांच्याबरोबर आता असलेल्या काहींनी दाते यांना अविभाजीत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्षपद दिले, तेव्हा थयथयाट केला होता. त्या त्राग्यातूनच दाते यांनी पक्ष सोडला होता. आता तेच दाते राष्ट्रवादी फुटीनंतर उमेदवारीसाठी अजित पवार गटात आले. तालुक्यातील मतदार सुशिक्षित आहेत. पारनेर तालुक्यातील अनेक मतदार मुंबईकर आहेत. त्यांच्या मताचे व्यवस्थापन हा निवडणुकीतील कळीचा मुद्दा आहे. खासदार लंके नियोजनात त्याबाबतीत कुणालाही ऐकणार नाहीत. पारनेर विधानसभेची निवडणूक ही खासदार लंके यांच्या प्रतिष्ठेची तर विरोधकांसाठी अस्तित्वाची झाली आहे. विशेष म्हणजे मतदारसंघात ही लढाई राष्ट्रवादीच्या दोन्ही गटात आहे. खासदार लंके यांच्या पत्नी राणी या निवडणूक रिंगणात असल्याने ही लढत लंके यांच्यासाठी प्रतिष्ठेची झाली आहे, तर महायुतीकडून अजित पवार गटाचे काशिनाथ दाते व काही प्रमुख अपक्ष असून त्यांच्यासाठी अस्तित्वाची ही लढाई झाली आहे. लोकसभेला लंके यांनी डॉ. सुजय विखे यांचा मोठा पराभव केला होता. विरोधात मोठी टीम एकत्र येऊनही मनोमिलनाअभावी ते लंके यांना रोखू शकले नव्हते. पारनेर विधानसभा निवडणुकीत तालुक्यातील विकास कामे, रस्ते, वीज, पाणी, पठार भागाला शेतीसाठी पाणी, सुपे औद्योगिक वसाहतीतील ठेकेदारी, रोजगारी, सुपे परिसरातील अतिक्रमणे हे महत्त्वाचे मुद्दे असले, तरी तालुक्यात मोठ्या प्रमाणात पतसंस्था बुडाल्या आहेत. या संस्था कोणी बुडवल्या, कोणी मोडून खाल्या, कोणी गोरगरीब जनतेच्या पैशावर राजकारण केले, सत्ता भोगल्या आणि कोणी कोणाला राजाश्रय दिला, याच्या चर्चा गावागावात रंगत आहेत. हे प्रमुख मुद्दे प्रचारात गाजत असून मतदार कोणाला पसंती देणार हे निकालानंतर स्पष्ट होणार आहे.

■■■




महाराष्ट्राच्या निवडणुकीमध्ये सर्वच पक्षांनी आपली पूर्ण ताकद लावली आहे. येथे भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी आघाडी महायुती आणि काँग्रेस-राष्ट्रवादी (शरद पवार)-शिवसेना (ठाकरे) यांची महाविकास आघाडी यांच्यामध्ये लढत आहे. या वेळी भाजपने धर्माचा मुद्दा उचलून धरला आहे. महायुती 'बाटेंगे ते काटेंगे'चा अजेंडा जनतेपर्यंत पोहोचवण्यात गुंतली असताना, काँग्रेससह महाविकास आघाडी मात्र आपल्या जुन्या फॉर्म्युल्यानुसार काम करत आहे. 'बाटेंगे विरुद्ध जुटेंगे'च्या या लढतीत कोण बाजी मारणार हा प्रश्नच आहे.

# 'बाटेंगे' विरुद्ध 'जुटेंगे'मध्ये लढत



**लक्षवेधी लढत**

भाजपने महाविकास आघाडीचा प्रमुख घटक असलेल्या शिवसेनेवर निशाणा साधला आहे. हिंदू मतांचे बळ एकवटले, तर आपला विजय निश्चित आहे, असे भाजपचे मत आहे. मुस्लिम मते भाजपच्या खात्यात फार कमी येतात, हे भाजपने गेल्या काही निवडणुकांमध्ये पाहिले आहे. अशा स्थितीत पक्ष उघडपणे हिंदुत्वाचे कार्ड खेळत आहे. राज्यातील एकूण ११.२४ कोटी लोकसंख्येपैकी मुस्लिम लोकसंख्या ११.५६ टक्के आहे. राज्यातील एकूण २८८ जागांपैकी ३८ जागांवर मुस्लिम मतदारांचा थेट प्रभाव असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. राज्यात नऊ जागांवर ४० टक्क्यांहून अधिक मुस्लिम मतदार आहेत. मालेगावमध्ये ७८.४ टक्के मुस्लिम लोकसंख्या आहे. याशिवाय मुंबादेवी ५०.९ टक्के, भिवंडी पश्चिम ४९.५ टक्के, अमरावती ४६.५ टक्के आणि अकोला पश्चिम ४१.६ टक्के इतकी मुस्लिम लोकसंख्या आहे. २०१९ च्या निवडणुकीमध्ये भाजप युती आणि काँग्रेस आघाडीने या ३८ मुस्लिमबहुल जागांपैकी ११-११ जागा जिंकल्या होत्या. शिवसेनेला नऊ जागा मिळाल्या होत्या. राष्ट्रवादी काँग्रेसने तीन, समाजवादी पक्ष आणि 'एमआयएम'ने प्रत्येकी दोन जागा जिंकल्या. ३८ मुस्लिम जागांवर फक्त आठ मुस्लिम उमेदवार निवडून आले.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये ३८ पैकी २० जागांवर भाजपच्या मतांची टक्केवारी वाढली आहे. मानखुर्द, भिवंडी पश्चिम, भायखळा, औरंगाबाद मध्य, अकोला, परभणी आणि बीड विधानसभा मतदारसंघामध्ये महायुतीच्या मतांची टक्केवारी १० टक्क्यांनी घसरल्याचे एका अहवालात नमूद करण्यात आले आहे. आता राज्यातील मुस्लिम लोकसंख्या किती आहे आणि त्यांच्याकडे किती जागा आहेत हे स्पष्ट झाले आहे. अशा स्थितीत हिंदुत्वाचे कार्ड खेळण्यामागे भाजपचा हेतू स्पष्टपणे दिसून येतो. दुसरीकडे, निवडणुकीपूर्वी 'ऑल इंडिया उलेमा बोर्डा'ची मागणी महाविकास आघाडीला अडचणीची ठरू शकते. 'ऑल इंडिया उलामा बोर्ड' ने महाविकास आघाडीला पाठिंबा देण्यासाठी १७ मागण्या मांडल्या आहेत. त्यात मुस्लिमांना १० टक्के आरक्षण, राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी आणि वक्फ दुरुस्ती विधेयकाला विरोध यासह १७ मागण्या आहेत. बोर्डाने राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना पत्रे लिहिली आहेत. महाराष्ट्रातील ४८ जिल्ह्यांतील मशिदी, दफनभूमी आणि दर्ग्यांच्या जप्त केलेल्या जमिनीचे सर्वेक्षण आयुक्तांमार्फत करण्याची मागणी 'उलेमा'ने केली आहे. हे पत्र व्हायरल झाल्यानंतर विश्व हिंदू परिषदेने अपेक्षेप्रमाणे त्यावर तीव्र प्रतिक्रिया दिली. पवार, ठाकरे आणि राहुल गांधी यांना त्याबाबत स्पष्टीकरण करण्याची मागणी केली. 'उलेमा'च्या मागण्या राज्य सरकारच्या अखत्यारित कमी आणि केंद्राच्या अखत्यारित जास्त आहेत. त्यामुळे महाविकास आघाडी त्या मान्य करू शकत नाही. शिवाय ११ टक्क्यांसाठी ८९ टक्के लोकांना दुखावणे महाविकास आघाडीला परवडणारे नाही. त्यामुळे पवार, ठाकरे आणि गांधी यांनी या पत्राची फारशी दखल घेतली नसली, तरी मुस्लिम पर्सनल बोर्डाने मात्र महाविकास आघाडीला कोणत्याही अटी न घालता पाठिंबा दिला आहे.

शिवसेनेची स्थापना करणारे बाळासाहेब ठाकरे यांनी यापूर्वीच राज्यात हिंदुत्वाचे कार्ड उघडपणे वापरण्यास सुरुवात केली होती. आता शिवसेना ठाकरे गट काँग्रेससोबत आहे. भाजपने हिंदुत्व आणि सावरकरांवर केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर देणे त्यांच्यासाठी कठीण आहे. अमित शाह यांनी ठाकरे यांना थेट आव्हानच दिले. औरंगजेबाचे प्रशंसक ठरवले. राहुल गांधी यांच्या तोंडून सावरकर यांच्याविषयी दोन वाक्ये चांगली बोलून दाखवा, असे आव्हान दिले. दोन्ही आघाडींनी त्यांच्या निवडणूक जाहीरनाम्यामध्ये महिला, शेतकरी, आदिवासी, दलित आणि मागासवर्गीयांवर लक्ष केंद्रित केले आहे; पण निवडणुकीचा अजेंडा हिंदुत्वाचा राहिला आहे. कलम ३७० हा मुद्दा आहे. त्याचवेळी काँग्रेस जात जनगणना, संविधान, दलित आणि मुस्लिमांच्या प्रश्नांच्या माध्यमातून मताधार शोधत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'बाटेंगे तो कटेंगे' हा नारा पुढे नेला असून आपण एकजूट राहिलो तर सुरक्षित राहू, असे म्हटले आहे. महाराष्ट्रात व्होट जिहादची स्पर्धा म्हणजे मतांचे धर्मयुद्ध असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. संभाजीनगरमध्ये आयोजित सभेत त्यांनी लोकसभा निवडणुकीत मतांच्या विभाजनामुळे धुळे आणि मालेगावमध्ये भाजपचा कसा पराभव झाला, असे सांगितले. मतांच्या ध्रुवीकरणावर युती आणि आघाडीचा भर आहे.

■■■

# कशी आहे यंदाची महाराष्ट्रातली निवडणूक?

**मुद्दे आणि गुद्दे**



महाराष्ट्रात एकूण २८८ विधानसभा मतदारसंघ आहेत. महाराष्ट्रामध्ये एकूण नोंदणीकृत रजिस्टर मतदारांची संख्या नऊ कोटी तीन लाख आहे. यात पुरुष मतदार चार कोटी ९३ लाख तर महिला मतदार ३ कोटी ६० लाख आहेत. या निवडणुकीतील तरुण नवमतदारांची संख्या अठरा लाख ६७ हजार आहे. दिव्यांग मतदारांची संख्या सहा लाख दोन हजार आहे तर ज्येष्ठ मतदारांची संख्या १२ लाख पाच हजार आहे.

निवडणूक आयोगाकडे एकूण २६० राजकीय पक्षांची नोंदणी झाली असून १६ मान्यताप्राप्त पक्ष आहेत त्यांची चिन्हे आरक्षित आहेत. उरलेले २४४ पक्ष आणि अपक्ष यांच्यासाठी आयोगाने एकूण १९० चिन्हे मुक्त केली आहेत.

महाराष्ट्रात एकूण एक लाख १८६ मतदान केंद्र आहेत. त्यातील ५७ हजार ६०१ ग्रामीण पोलिंग स्टेशन आणि शहरात ४२ हजार ५८२ पोलिंग स्टेशन असतील. सर्व पोलिंग स्टेशनवर सुविधा देण्यात येणार आहेत. ८५ पेक्षा जास्त वय असलेल्या मतदारांना घरुन मतदान करता येणार आहे.

जास्तीत जास्त मतदान व्हावे आणि भयमुक्त वातावरणात निवडणुका पार पाडाव्यात म्हणून कडक निर्देश दिले गेले आहेत. कोणत्याही प्रकारचं प्रलोभन, पैसे वाटप, ड्रग्स वाटप, दारूचं वाटप यावर लक्ष असेल.२४ तास चेकिंग केले जाईल. एक्साईजचे अधिकारी आणि इतर अधिकारी चेक पोस्टवर राहतील. अर्थातच चेकिंगचा अर्थ असा नाही की सर्व सामान्यांना त्रास द्यावा, असेही सांगितले गेले आहे.

■■■

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक २२२ * * नागपूर * मंगळवार, दि.१९ नोव्हेंबर २०२४ ८ पाने • किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

अग्राग्रलेख

## खरीखरी...

### थांबले रे, बाबा थांबले

काल सायंकाळी पाच वाजल्यानंतर अनेक धुरंधरांची भाषा बंद झाली. नेहमीप्रमाणे या निवडणुकीतही आरोप प्रत्यारोप झाले. पण या वेळेची भाषा अतिशय भेदक, त्यासोबतच चित्तवेधक आणि विरोधकांना शत्रू समजून त्यांच्यावर हल्ले करण्याची होती. समाजातील अशुद्ध हवेचे प्रदूषित झालेले वातावरण या मोठमोठ्या नेत्यांच्या अग्नीवषार्मुळे आणखीनच पेटले. सत्ताधारी काय किंवा विरोधक काय दोघांनीही आश्वासनांचा प्रचंड भडीमार केला. काँग्रेस अध्यक्ष खर्गे साहेब म्हणाले, त्याप्रमाणे जी आश्वासने पूर्ण करता येतात तेवढीच द्या. पण त्यांच्या सूचनेला कोण मानतो? महाराष्ट्राच्या तिजोरीत खणखणाट आहे. पण आमच्या नेत्यांची मुजोरी मात्र झणझणाट आहे. एका राजाने एका कलाकाराला त्याच्या कलेबद्दल एक लाख रुपयांची घोषणा केली होती. त्यानंतर एक महिन्याने तो राजाकडे पुन्हा पैसे मागायला आला. तेव्हा राजाने सांगितले काही काळजी करू नको. तुला लवकरच दोन लाखाचे दागिने मिळतील. तो कलाकार बिचारा आनंदाने घरी गेला. राजाच्या आश्वासनानंतरही पैसे आले नाहीत आणि दागिनेही आले नाहीत. त्यामुळे पुन्हा तो राजाकडे गेला. त्याने आपल्या कलेने राजाचे कान तृप्त करून टाकले?. यावेळी राजा त्याला म्हणाला जरा थांब तुला आणखी मौलिक हिरे मोती देऊन टाकू. राजाच्या या आश्वासना नंतरही कलाकार घरी गेला. त्यानंतर पुन्हा महिन्याभराने जेव्हा कलाकार परत आला आणि त्या कलाकाराने धन मागितले. तेव्हा राजा म्हणाला, बाबा रे तुज्या कलेने तू मला आनंद दिला आहेस. त्याप्रमाणेच परतफेड म्हणून मीही तुज्या कानाला आनंद दिलेला आहे. हिशोब बरोबर आहे. देणेघेणे संपले. अशा हुशार राजाच्या आश्वासनाप्रमाणे जनतेला तृप्त करणारी दिखाऊ स्वप्ने आपल्या पुढाऱ्यांनी ओरडून दिलेली आहेत. बिचाऱ्या गरीब जनतेच्या कानाला खूप आनंद झाला आहे. ही खबर कानोकानी अनेक लोकांपर्यंत पोहोचली. पण भविष्यात कोणाच्या हाती काय लागते. याचा लेखाजोखा करण्यासाठी पुढे आपले पुढारी दिसतील का? हा खरा प्रश्न आहे जनतेची तिजोरी आश्वासनांनी भरलेली आहे. आश्वासनाची सोनेरी स्वप्ने पहात बिचाऱ्या मतदारांच्या आणखी दोन रात्री सुख स्वप्नाच्या होतील असे वाटते आहे. परवा एकदा मत टाकले रे टाकले ! की, मग पुन्हा पाच वर्षाच्या पुनर्भेटीसाठी तेही मोकळे आणि आपणही मोकळे. अशी आपली ही भन्नाट निवडणूक आता दोन कत्तलीच्या रात्री पार करून पवित्र होणार आहे. आपण जेव्हा हे वाचत किंवा बघत असाल. तेव्हा एक रात्र झालेली असेल आणि तुमची गात्रं शिथिल होऊन गेलेली असतील किंवा 'आज की रात ये कैसी रात, की हमको नींद नही आती' या गीताप्रमाणे तेजाने सारे काही बहरत असल्यासारखे वाटेल. मात्र मुख्य वास्तव वेगळेच आहे. तुमच्या खांद्यावर कोणाचाही झेंडा असो. तुमचे खांदे फक्त वापरण्यासाठीच आहेत. हे नेहमी लक्षात ठेवा. घरची चटणी भाकरी जेवा. करू नका कोणाचा हेवा, अन्यथा तुम्हाला करावे लागेल देवा देवा!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# निवडणुकीच्या प्रचाराचा धुरळा संपला

## आता भेटीगाठी व गुप्त बैठकांवर जोर
## बुधवारी मतदान, शनिवारी निकाल

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :

मागील ४ आठवड्यांपासून राज्यभर सुरू असणारा विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा धुरळा अखेर सोमवारी सायंकाळी ५ वाजता खाली बसला.


आता राजकीय पक्षांकडून भेटीगाठी व गुप्त बैठकांद्वारे मतदारांपर्यंत प्रयत्न सुरू होणार आहे. यात मतदारांना पैसे व भेटवस्तू वाटण्याचेही प्रकार होण्याची शक्यता आहे. पण निवडणूक आयोगाने असे प्रकार रोखण्यासाठी भरारी पथकांच्या माध्यमातून करडी नजर ठेवली आहे.

दरम्यान, आता प्रचारसभा, रोड शो, पदयात्रा, बाईक रॅली आदींचा दणदणाट शांत झाला असून, अवघ्या महाराष्ट्राला बुधवारी होणाऱ्या निवडणुकीचे वेध लागले आहेत.

निवडणूक आयोगाने गत महिन्यात विधानसभा निवडणुकीची घोषणा केली. त्यानंतर राज्यात प्रचाराचा धडाका सुरू झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी सत्ताधारी महायुतीसाठी आपला पूर्ण जोर खर्ची केला.

तर विरोधी बाकावरील महाविकास आघाडीसाठी काँग्रेस नेते राहुल गांधी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी घाम गाळत मतदारांना आपल्यामागे उभे टाकण्याचे आवाहन केले.

दरम्यान, महायुती व महाविकास आघाडीने आपलाच विजय होणार असल्याचा दावा केला आहे. मतदार कुणाच्या पारड्यात आपले मतदान टाकतील हे मतमोजणीत स्पष्ट होणार आहे.



### बुधवारी २८८ सदस्यीय विधानसभेसाठी मतदान

२८८ सदस्यीय महाराष्ट्र विधानसभेसाठी बुधवारी एका टप्प्यात मतदान होणार आहे. त्यात राज्यातील 4 कोटी 95 लाख पुरुष व 4 कोटी 64 लाख महिला मतदारांसह एकूण 9 कोटी 59 लाख मतदार आपला मताधिकार बजावतील. हे मतदार 4136 उमेदवारांच्या भवितव्याचा फैसला मतदान यंत्रात बंद करतील. 'द असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स'च्या (अडफ्र) माहितीनुसार, राज्यातील 4136 उमेदवारांपैकी 490 उमेदवार हे राष्ट्रीय पक्षांचे, 496 उमेदवार प्रादेशिक पक्षांचे, 1036 उमेदवार मान्यता नसलेल्या पक्षांचे, तर 2087 उमेदवार हे अपक्ष म्हणून निवडणुकीच्या मैदानात आहेत.

## महाविकास आघाडीचा मराठी अस्मितेला हात

शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतरची ही पहिलीच विधानसभा निवडणूक आहे. त्यामुळे या दोन्ही पक्षांच्या नेत्यांना या निवडणुकीद्वारे आपलाच गट खरा राष्ट्रवादी व शिवसेना आहे हे दाखवून देण्याची नामी संधी आहे. त्यात शरद पवार व उद्धव ठाकरे यांनी राज्यभरात सभा घेत अवघा महाराष्ट्र पिंजून काढला. भाजपने आपल्याला कसा धोका दिला? व एकनाथ शिंदे यांनी आपल्याशी कशी गद्दारी केली? हे उद्धव ठाकरे यांनी मतदारांना पटवून देण्याचा प्रयत्न केला.

शरद पवार यांनी या प्रकरणी भाजपवर प्रहार करत अजित पवार यांच्यासह त्यांच्या सहकारी आमदारांना पाडण्याचे आवाहन केले. या प्रकरणी मोदी - शहांच्या भाजपपासून महाराष्ट्राचा बचाव करणे महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित करत मराठी अस्मितेला हात घालण्याचा प्रयत्न केला.

## महायुतीचा संपूर्ण जोर हिंदुत्वावर

दुसरीकडे, भाजप व महायुतीचा संपूर्ण प्रचार हिंदुत्वाच्या मुद्याभोवती फिरता राहिला. प्रचाराच्या सुरुवातीच्या टप्प्यात महायुतीने विकासाच्या जोरावर मते मागितली. पण त्यानंतर हा प्रचार उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दिलेल्या 'बटेंगे तो कटेंगे' व त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'एक है तो सेफ है'च्या दिशेने पुढे सरकला. आज प्रचाराच्या अखेरच्या दिवशीही महायुतीने या मुद्यावरून विरोधकांवर निशाणा चढवत मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केला.

## सत्ताधारी नेत्यांकडून पोलिस यंत्रणेचा गैरवापर
रमेश चेन्नीथला

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :

२० नोव्हेंबर रोजी राज्यात विधानसभेची निवडणूक पार पडत आहे. या निवडणुकीचा प्रचार आज संपत आहे. पण पराभव समोर दिसत असल्याने सत्ताधारी पक्षांकडून सत्ता, यंत्रणा आणि पैशाचा गैरवापर मोठ्या प्रमाणात सुरु असल्याच्या तक्रारी काँग्रेस पक्षाकडे येत आहेत.

यात सर्वात जास्त पोलीस दलाचा वापर केला जात आहे. अत्यंत निष्पक्ष निवडणुका आणि लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे त्यामुळे निवडणूक आयोगाने याची तात्काळ दखल घेऊन हस्तक्षेप करावा, अशी मागणी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी केली आहे.

## लॉरेन्सच्या भावाला अटक

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १८ :

गँगस्टर लॉरेन्सचा भाऊ अनमोल याला अमेरिकेत अटक झाल्याची बातमी आली आहे. त्याला कॅलिफोर्नियामध्ये अटक करण्यात आली आहे.

अनमोलवर सलमान खानच्या घरावर गोळीबार केल्याचा आरोप आहे.

## खडसेंची राजकीय संन्यासाची घोषणा



■ वृत्तसंस्था, जळगाव, दि. १८ :

महाराष्ट्रातील राजकारणात चार दशकांपासून कार्यरत असलेले पूर्वाश्रमीचे भाजप नेते आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आमदार एकनाथ खडसे यांनी राजकीय संन्यासाची घोषणा केली. यापुढे कोणतीही निवडणूक न लढण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला.



# गुटखा विक्रेत्यांवर पोलिसांची कारवाई




■ महासागर प्रतिनिधी,

**वाशीम , दि. १८ :** येथील मालेगाव वाशीम रोडवर मालेगाववरुन अनसिंग येथे संकट मोचन हनुमान मंदिर जवळ राज्य महामार्ग क्रमांक १६१ च्या पुलावर १३ नोव्हेंबर रोजी दुपारी एक वाजेदरम्यान महिंद्रा सुप्रो वाहनाची तपासणी करण्यात आली. यात ४ लाख ८६ हजार रुपये किंमतीच्या गुटख्यासह एकूण ११ लाख ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. या कारवाईत विशाल अशोक लासकर, वय २४ वर्ष, प्रविण चंद्रकांत यादव वय २५ वर्ष, दोन्ही रा. जाट गल्ली रिसोड यांच्या ताब्यातून प्रतिबंधित गुटखा पानमसाला जप्त करण्यात आला. गुटख्याची एकूण किंमत ४ लाख ८६ हजार ५६० रुपये एवढी आहे. आरोपीने गुन्हयात वापरलेले पाच लाख रुपये किंमतीचे महिंद्रा सुप्रो वाहन, तसेच एक लाख रुपये किंमतीचे टीव्हीएस ज्युपिटर वाहन, दोन५३ हजारांचे दोन मोबाइल असा एकूण ११,३४,५६०,, रुपयांचा मुद्देमाल पोलिसांच्या पथकाने जप्त केला. आरोपींची अधिक चौकशी केली असता हा माल बंडू नंदलाल यादव, रा. वंदेमातरम चौक मालेगाव यांचा असल्याचे सांगितले. यावरुन विशाल अशोक लासकर, प्रविण चंद्रकांत यादवसह बंडू नंदलाल यादव यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन वाशीम ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुज तारे, अपर पोलीस अधीक्षक लता फड यांच्या मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी नवदीप अग्रवाल, सपोनि. दिनेश शिरेकार, पो. स्टाफ पोहेकॉ. हरिभाऊ कालापाड, पोहेकॉ. अरविंद राठोड, पोको. स्वप्नील शेळके, नापोको. गणेश बाजड यांनी केली.

# गत निवडणुकीमध्ये कमी मतदान झालेल्या परिसरावर लक्ष केंद्रीत

## जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी; मतदारांशी संवाद



■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. १८ :** विधानसभा निवडणुकीत मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी जनजागृती व प्रयत्न होत आहेत. गत निवडणुकीत कमी मतदान झालेल्या परिसरात लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, मोठ्या प्रमाणावर जागृतीपर स्टीकर व पत्र प्रसिद्ध करण्यात आले असून, ठिकठिकाणी व घरोघर लावण्यात येत आहेत. याच अंतर्गत जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी बुधवारी उमरी परिसरात भेट देऊन मतदारांशी संवाद साधला. लोकसभा निवडणुकीत टक्क्यांपेक्षा जास्त मतदानाचे उद्दिष्टसमोर ठेवण्यात आले.

मात्र हे साध्य झाले नाही. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत यापेक्षा जास्त मतदान होण्यासाठी प्रयत्न होणार आहेत. मतदार साक्षरता अभियान अर्थात स्वीप (सिसस्टेमॅटिक व्होटर्स एन्युकेशन अँड इलेक्टोरोल पार्टीसिपेशन) अंतर्गत उपक्रम राबवण्यात येत आहेत.

दरम्यान १३ ऑक्टोबर अधिकाऱ्यांनी उमरी परिसराची पाहणी केली. मतदार चिठ्यांबाबत तपासणी जिल्हाधिकाऱ्यांनी मोठी उमरी, विठ्ठलनगर येथे अनेक ठिकाणी भेट देऊन मतदारांशी संवाद साधला व मतदानाबाबत आवाहन केले. मतदारांना मतदार चिठ्ठ्या मिळत आहेत किंवा कसे, याचीही तपासणी त्यांनी केली. यावेळी जिल्हाधिका-यांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व आशा वर्कर यांच्याशीही संवाद साधून विविध बाबींची माहिती घेतली.

# श्री नरसिंग महाराजांचा यात्रा महोत्सव

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोट, दि. १५ :** दरवर्षी प्रमाणे श्री नरसिंग महाराज यात्रा महोत्सवानिमित्त १६ ते २८ नोव्हेंबर या कालावधीत श्री नरसिंग महाराज मंदिरात आयोजित करण्यात आला आहे. त्या निमित्ताने दररोज भजन,प्रवचन, हरिपाठ, भारुड,नाम संकीर्तन आदी कार्यक्रम होणार आहेत.



श्री सदगुरू संत नरसिंग महाराज (आकोट)

१६ नोव्हेंबरला कार्तिक वद्य प्रतिपदा श्री तीर्थ स्थापना सकाळी ४ वाजता, १८ नोव्हेंबरला सकाळी ४ वाजता कार्तिक वद्य तृतीया श्री संत मियासाहेब यांची तक्त स्थापना तसेच कार्तिक मास काकडा आरती समाप्ती, १४ नोव्हेंबरला नरसिंग महाराज यांची पालखी श्री गुरुपुजे (संदल) करिता गुरुस्थानी उमरा ता. अकोट येथे अनंतराव देशमुख (कुटासा) यांच्या प्रमुख सहभागात दुपारी १वाजता निघेल. तसेच श्री गुरुपूजेनंतर सायंकाळी वाजता अग्रसेन चौक, पोपटखेड रोड येथून श्री पालखी मिरवणूक श्री नरसिंग मंदिरात परत येईल. २० नोव्हेंबर २०२४ कार्तिक वद्य पंचमीला श्री नरसिंग महाराज यांची यात्रा (विविध धार्मिक कार्यक्रम)

२१ नोव्हेंबर कार्तिक वद्य षष्ठी ला श्री नरसिंग महाराज यांची पालखी सकाळी ४ वाजता अनंतराव देशमुख (कुटासा) यांच्या प्रमुख सहभागात श्री नरसिंग मंदिरातून निघेल व दुपारी ४ वाजता श्री पालखी मिरवणूक श्री मंदिरात परत येईल. त्यानंतर गोपाळकाला (दहीहंडी) तसेच महाप्रसाद होईल. २३ नोव्हेंबर कार्तिक वद्य अष्टमीला श्री हरीनाम सप्ताहाची समाप्ती सकाळी ४ वाजता प्रभाकर बुवा सरोदे (अकोट) यांच्या काल्याच्या कीर्तनाने सकाळी ११ वाजता होईल.

२७ नोव्हेंबर कार्तिक वद्य द्वादशीला श्री नरसिंग महाराजांचे समाधीस सकाळी वाजता रुद्राभिषेक व सकाळी ४वाजता श्री गाईची पूजा (गोतांबील), २८ नोव्हेंबर २०२४ कार्तिक वद्य त्रयोदशीला श्री संत मियासाहेब यांचियी तक्तासमोर काकडा आरती, भजन, गोपाळकाला प्रक्षाळ पूजेचे भजन, रात्री ८ ते १०पर्यंत श्री नरसिंग महाराज यात्रा महोत्सव कार्तिक वद्य पंचमी झाल्यानंतर पुढील ५बुधवार व रविवारपर्यंत सुरु राहील. भाविक, भक्तांनी या आयोजनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थान चे अध्यक्ष सतीश आसरकर यांनी केले आहे.

# किराणा दुकानतून जप्त केला सुगंधी तंबाखूचा साठा

■ महासागर प्रतिनिधी,

**पुसद , दि. १८ :** मधुकर नगर येथे राहणाऱ्या किराणा दुकान चालकाच्या घरामध्ये मोठ्या प्रमाणात सुगंधी तंबाखू व पान मसाला असल्याची माहिती उपविभागीय अधिकाऱ्याने नेमलेल्या पथकाला मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे पथकाने दि. नोव्हेंबर रोजी रात्री . वाजताच्या दरम्यान मधुकर नगर येथील घरात धाड टाकली असता हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.



श्रीकांत मधुकर पेन्शनवार (वय ५०) वर्ष रा. मधुकर नगर असे कारवाई झालेल्या किराणा दुकान चालकाचे नाव आहे. उपविभागीय अधिकाऱ्याने नेमलेल्या पथकाकडून मिळालेल्या माहितीनुसार शहरापासून जवळच असलेल्या मधुकर नगर येथे राहणाऱ्या श्रीकांत हा दुकान चालक असून त्याने त्याच्या दुकान्याच्या मागील बाजूस असलेल्या घरात सुगंधी तंबाखू व पान मसाला साठवून ठेवल्याची माहिती मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे हेड कॉन्स्टेबल अभिजीत सांगळे, उमेश राठोड, रोहिदास राठोड, संतोष सरकुंडे ,संदीप पवार, नरेश नरवाडे, पराग गिरनाळे, इरफान आगवान, तुळशीदास आमटे, कल्पना रबडे, संदळी चहांदे, सोनाली शेळके, नेहा चव्हाण यांनी घरात टाकली असता घरातील झोपण्याच्या बेडमध्ये हजार ८८४ रुपयाचा मुद्देमाल आढळून आल्याने जप्त केला आहे. सोबतच किराणा दुकान चालकाला देखील अटक केले आहे. प्रकरणाचा अधिक तपास वसंत नगर पोलिस ठाण्यामार्फत केल्या जात आहे.

# आठ दिवस विविध अधिवासात पक्षीनिरीक्षण

■ महासागर प्रतिनिधी,

**वर्धा, दि. १८ :** बहार नेचर फाउंडेशन, वर्धा वनविभाग आणि बोर व्याघ्र प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पक्षीसप्ताहाचा समारोप न्यू बोर व्याघ्र प्रकल्प येथे करण्यात आला. सलग आठ दिवस निसर्गप्रेमींनी पक्षीनिरीक्षण करून शरद ऋतूत आढळणाऱ्या पक्ष्यांची नोंद घेतली. या काळात विद्यार्थी व ज्येष्ठांशी संवाद साधत बहारद्वारे निसर्ग जागरही करण्यात आला. अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या जन्मदिनी स्थानिक वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाच्या सहकार्याने ५ नोव्हेंबरला सुरू झालेल्या या पक्षी सप्ताहाची सांगता जागतिक ख्यातीचे पक्षीतज्ज्ञ डॉ. सालीम अली यांच्या जयंतीदिनी बोर अभयारण्यात करण्यात आली. या सप्ताहादरम्यान वनविभाग नर्सरी, उमरी मेघे येथील माळरान, पवनार येथील धाम नदी,




दिग्रस तलाव, सावंगी मेघे येथील तलाव, ढगा वनक्षेत्रातील हत्तीडोह, पिंपरी येथील करुणाश्रम परिसर अशा वैविध्यपूर्ण अधिवासात पक्षी निरीक्षण करण्यात आले. पक्षीसप्ताहाचा समारोप सेलू तालुक्यातील नवीन व्याघ्र प्रकल्पाअंतर्गत कार्यरत निसर्गरम्य प्रशिक्षण केंद्रामध्ये करण्यात आला. या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहार नेचर फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. बाबाजी घेवडे होते. यावेळी बोर व्याघ्र प्रकल्पाच्या वनपरिक्षेत्र अधिकारी अर्चना नौकरकर, न्यू बोर व्याघ्र प्रकल्पाच्या वनपरिक्षेत्र अधिकारी पूनम ब्राह्मणे, बहारचे उपाध्यक्ष दीपक गुढेकर, सचिव जयंत सबाने, क्षेत्र सहाय्यक पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. बाबाजी घेवडे यांनी वातावरण बदलांच्या गंभीर परिणामाची जाणीव करून देत त्यावरील उपाययोजना करण्याची आवश्यकता मांडली. या कार्यक्रमात क्षेत्र सहाय्यक पठाण यांनी वनविभागामधील वैविध्यपूर्ण अनुभव कथन केले. प्रास्ताविक जीवशास्त्रज्ञ दर्शन दुधाने यांनी केले. संचालन वनरक्षक मनेषकुमार सज्जन यांनी तर आभार बहारचे सहसचिव देवर्षी बोबडे यांनी मानले.

**ॲक्सिस बँक लि.** (CIN: L65110GJ1993PLC020769)
कॉर्पोरेट ऑफिस: क्सिस हाऊस, स्ट्रक्चर्ड सेट्स ग्रुप,
सी-२, वाडिया इंटरनॅशनल सेंटर, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी,
मुंबई-४०००२५; दूरध्वनी: +९१ ९९२००८५३८५ www.axisbank.com

**जंगम आणि स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ६(२) आणि ८ (६) च्या तरतुदीसह वाचलेल्या आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदाराला म्हणजेच त्रिभोवनदास भीमजी झवेरी आणि सन्स रिटेल प्रायव्हेट लिमिटेड आणि जामीनदार/गहाणदार/मालक अर्थात हेमंत झवेरी, त्रिभोवनदास भीमजी झवेरी आणि सन्स प्रायव्हेट लिमिटेड आणि त्रिभोवनदास भीमजी झवेरी आणि ब्रॉस प्रायव्हेट लिमिटेड यांना नोटीस देण्यात आली आहे कि खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता क्सिस बँक लिमिटेड कडे गहाण/शुल्क आकारली आहे. म्हणजे सुरक्षित कर्जदार, ज्याचा भौतिक ताबा ॲक्सिस बँक लिमिटेडच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे म्हणजेच सुरक्षित कर्जदार १२ डिसेंबर २०२४ रोजी जसे आहे तेथे आधारावर, जसे आहे तसे आहे, जे काही आहे ते आधार आहे आणि कोणताही आधार नाही वर ४२,५०,१२,०४८.७७/- (रुपये बेचाळीस कोटी पन्नास लाख बारा हजार अठ्ठेचाळीस रुपये आणि सत्त्यातर पैसे फक्त) च्या वसुलीसाठी विकले जाईल. १३.०८.२०२० पर्यंत अधिक व्याज १४.०८.२०२० पासून ॲक्सिस बँक लि. च्या कराराच्या दराने म्हणजेच उपरोक्त कर्जदार/जामीनदार/गहाणदार/मालकांकडून सुरक्षित कर्जदार. राखीव किंमत असेल:

| मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत | अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) | लिलाव आयडी |
|---|---|---|---|
| •४८२ चौरस फूट आकाराचे दुकान क्रमांक १, घर क्रमांक ७१९/एफ/ए/१ •दुकान क्रमांक १-ए १०० चौरस फूट, घर क्रमांक ७१९/एफ/ए/१/ए • ४६९ चौरस फूट आकाराचे दुकान क्रमांक २, घर क्रमांक ७१९/एफ/ए/२. •८४८ चौरस फूट आकाराचे दुकान क्रमांक २-, घर क्रमांक ७१९/एफ/ए/२/ए •शॉप ब्लॉक क्रमांक ६ सुमारे ५०० चौरस फूट, घर क्रमांक ७१९/एफ/ए/३८ नागपूर येथे असलेली मालमत्ता, खसरा क्रमांक ११६, पूनम चेंबर्स, चिंदवाडा रोड, चाओनी रोड ता. आणि जि. नागपूर | रु. ३,७०,००,०००/- (रुपये तीन कोटी सत्तर लाख) | रु. ३७,००,०००/- (रुपये सदतीस लाख) | ३१९८४१ |

त्यावर बांधलेल्या इमारतीसह इतर मालमत्तेसह जसे की फर्निचर आणि फिक्स्चर, उपकरणे, यंत्रसामग्री - स्थिर आणि जंगम संरचना किंवा त्यामध्ये असलेली इतर कोणतीही मालमत्ता कर्जदार/ जामीनदार/ गहाणदार(चे) उपविभाग (८) च्या तरतुदींकडे लक्ष वेधतात. ) कायद्याच्या कलम १३ च्या, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी.

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी, कृपया https://www.axisbank.com/auction-notices आणि/किंवा https://axisbank.auctiontiger.net मध्ये प्रदान केलेल्या दुव्याचा संदर्भ घ्या. (लिलाव आयडी वर नमूद केला आहे)

तारीख: १९ नोव्हेंबर २०२४
ठिकाण: मुंबई आणि नागपूर

स्वा/- अधिकृत अधिकारी,
ॲक्सिस बँक लि.

# दिव्यांग कर्मचाऱ्यांना विधानसभा निवडणुकीच्या कामातून वगळा

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. १८:** विधानसभा निवडणुकीच्या कामातून दिव्यांग कर्मचाऱ्यांना वगळण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेने प्रशासनाकडे केली आहे. यापूर्वी लोकसभा निवडणुकीत मतदानाच्या ठिकाणी सुविधा नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे. निवडणुकीत जबरदस्तीने काम दिले जात आहे, असेही संघटनेचे म्हणणे आहे. जिल्ह्यात विधानसभेच्या अकोला पूर्व, अकोला पश्चिम, अकोट, मूर्तिजापूर, बाळापूर असे पाच मतदारसंघ असून, प्रत्येक मतदारसंघासाठी स्वतंत्र निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येकाला सहाय्यक म्हणून तीन अधिकारी राहणार आहेत. मतमोजणी त्या-त्या मतदारसंघाच्या ठिकाणीच होणार आहे. निवडणुकीच्या कामात नियुक्तीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेने जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर केले होते. संघटनेने निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. यावेळी अध्यक्ष संजय बरडे ,मो. अ. अजीज, दिलीप सरदार, जावेद इक्बाल, रवींद्र देशमुख, रवींद्र सिरसाट, सुभाष पिसे, दीपक वाघमारे, गणेश महल्ले आदी होते. असा आहे दावा कर्मचारी संघटनेने दिव्यांग कर्मचाऱ्यांना निवडणुकीबाबत दिलेले आदेश रद्द करण्याची मागणी केली आहे. निवडणूक आयोगाने व शासन निर्णयाप्रमाणे दिव्यांग कर्मचारी यांना सुट देण्याचे आदेश आहेत. त्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारचे निवडणूक काम देण्यात येऊ नये. तसेच चुकून एखाद्याचा आदेश आला आणि त्याने विनंती केली तर त्यालाही वगळण्यात यावे. तसेच महत्त्वाचे व्हीआयपी आयडीयल बुथवरही दिव्यांग कर्मचारी यांना देण्यात येऊ नये, असे निर्देश असल्याचा दावाही कर्मचारी संघटनेचे केला आहे.



# १७ गुन्हेगारांवर एमपीडीए लावणार

■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ , दि. १५ :** कायदा व सुव्यवस्था अबाधीत ठेवण्यासाठी उपविभागातील १७ सराईत गुन्हेगारांचा एमपीडीए प्रस्ताव तयार करण्यात आला असून आतापर्यंत दहा गुन्हेगार कारागृहात स्थानबध्द करण्यात आले आहे. निवडणूक, सन उत्सवाच्या पार्श्वभूमिवर पोलिस प्रशासन ॲक्शन मोडवर आले आहे असून तब्बल गुन्हेगारांना चक्क जिल्ह्यातून तडीपार देखील करण्यात आले आहे. यवतमाळ उपविभागात वारंवार नागरिकांना मारहाण करणे, खून, खंडणी, शस्त्रांचा धाक दाखवून लुबाडणे, जाळपोळ,तोडफोड, हातभट्टी दारू विकणे,तसेच अवैध धंदे बळाच्या जोरावरचालवण्यासारखे गंभीर गुन्हे गुंड,गुन्हेगारांकडून केल्या जातात.त्यामुळे नागरिकांमध्ये दहशत निर्माणहोते. अशावेळी नागरिकहीत्यांच्याविरोधात तक्रार करण्यास पुढेयेत नाहीत. कायदा व सुव्यवस्थेचागंभीर प्रश्न पोलिस आणिप्रशासनापुढे निर्माण होत आहे. अशागुंड, गुन्हेगारांचा बंदोबस्त करणे,त्यांना वचक बसविण्यासाठी जिल्हापोलिस अधिक्षक कुमार चिंतायांच्या आदेशान्वये यवतमाळउपविभागीय पोलिस अधिकारीदिनेश बैसाने यांच्या मार्गदर्शनाखालीअवधुतवाडी, शहर, लोहारा, ग्रामिण, कळंब आणि बाभुळगावपोलिसांनी सराईत गुन्हेगारांची यादीतयार केली आहे. त्या गुन्हेगारांवरएमपीडीए ॲक्ट, तडीपारनुसारकारवाई करण्याचे आदेश देण्यातआले आहे. आतापर्यंत यवतमाळउपविभागातील सराईतगुन्हेगारांचा एमपीडीए अंतर्गत प्रस्तावतयार करण्यात आला असून दहाजणांना कारागृहात स्थानबध्दकरण्यात आले आहे. यवतमाळउपविभागातील ३६ जणांनाजिल्ह्यातून तडीपार करण्यात आलेआहे. आगामी काळात आणखीसराईत गुन्हेगारांसह त्यांच्या टोळींवरमोक्का अंतर्गत कारवाई करण्यातयेणार आहे.

Format C-1

Declaration about Criminal Cases
Name and Address of Candidate: Adv. Ashwin Vinayak Jawade. 409, infront of Cricket Ground Bezonbagh, Nagpur 440014
Name of Political Party – INDEPENDENT
Name of Election : Maharashtra Legislative Assembly
Name of Constituency: North Nagpur Constituency (57)
I, Adv. Ashwin Vinayak Jawade a candidate for the abovementioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

(A) Pending Criminal Cases

| Sr. No. | Name of Court | Case No. and dated | Status of Case | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 09/2020, Ambazari Police Station, Ravinagar Square, Nagpur | 1464/2020, 6th Jt. Civil Judge Jr. Dn and JMFC, Nagpur | Charges not framed | 354 D IPC, Stalking -Whoever commits the offence of stalking shall be punished on first conviction with imprisonment of either description for a term which may extend to three years, and shall also be liable to fine; | In this case I was addressing the issue of corruption hence the said allegations were frame in both matters, I have filed the complaint against the complainant hence the counter complaints were filed against me. |
| 2 | 13/2020, Ganeshpeth Police Station, Ganeshpeth, Nagpur | 3523/2021, 8th Jt. Civil Judge Jr. Dn and JMFC, Nagpur | Summons | 448 IPC - House Tresspass, 294 IPC- Obscene Acts and Songs 506 IPC- Punishment for Criminal Intimidation | |
| 3 | 1250/2022, Jaripatka Police Station, Jaripatka, Nagpur | | not filed in Court, as per the ecourts search | 504IPC - Intentional insult with intent to provoke breach of the peace. 506 IPC- Punishment for Criminal Intimidation, | In the above cases the complainant has falsely encroached and occupied more than 24000 Sq. Ft land, I have filed the complainant against the complainant hence the counter complaints were filed against me. |
| 4 | 133/2023, Jaripatka Police Station, Jaripatka, Nagpur | 14225/2023, 20th Jt. Civil Judge Jr. Dn and JMFC, Nagpur | Summons | 294 IPC- Obscene Acts and Songs, 506 IPC- Punishment for Criminal Intimidation | |
| 5 | 961/2023, Jaripatka Police Station, Jaripatka, Nagpur | | not filed in Court, as per the ecourts search | 325 IPC, Punishment for voluntarily causing grievous hurt, 452 IPC-House-trespass alter preparation for hurt, assault or wrongful restraint. 504IPC - Intentional insult with intent to provoke breach of the peace. 506 IPC- Punishment for Criminal Intimidation, | |
| 6 | 720/2023, Jaripatka Police Station, Jaripatka, Nagpur | | not filed in Court, as per the ecourts search | 504IPC - Intentional insult with intent to provoke breach of the peace. 506 IPC- Punishment for Criminal Intimidation, | |

# नाफेडद्वारे सोयाबीन खरेदीचा शुभारंभ

■ महासागर प्रतिनिधी,

**चांदूर रेल्वे , दि. १८ :** येथील तालुका खरेदी विक्री संघामार्फत मंगळवारी, १२ नोव्हेंबरपासून येथे सोयाबीनची शासकीय खरेदी सुरु झाली. शेतकरी भवनच्यामागे डी.एम.ओ. गोडावूनमध्ये नाफेडद्वारे ही खरेदी सुरु करण्यात आली. आजच्या पहिल्याच दिवशी साडे २७ क्विंटल सोयाबीनची खरेदी करण्यात आली. खुल्या बाजारात सोयाबिनचा दर ४ हजार रुपयांच्या आसपास आहे, तर नाफेडची सोयाबीन खरेदीचा दर ४ हजार ८४२ रुपये आहे.



या खरेदीसाठी ज्या शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली, त्या वीस शेतकऱ्यांना मोबाईलद्वारे संदेश देण्यात आला. त्यापैकी एकच शेतकरी सोयाबीन खरेदीला हजर झाला. हजर झालेल्या सुमित मुंडवाईक (रा.धानोरा मोगल) या शेतकऱ्याचा काटा पुजनानंतर खरेदी विक्री संघाचे व्यवस्थापक राहुल कोरडे यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देवुन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी ग्रेडर मनीष टेकाडे, प्रभाकर ईखार, गौरव आरेकर, बाजार समितीचे संचालक सुरेश जाधव, सुभाष वानखडे शेतकरी उपस्थित होते. नाफेडद्वारे बारदाना पोहोचवण्यास विलंब झाल्याने सोयाबिनची खरेदी लांबली होती. परंतु बारदाना येताच आज शुभारंभ करण्यात आला.

दर्यापुरात सीसीआयकडून कापसाची खरेदी सुरू चांदूर रेल्वेत सोयाबीनची सरकारी खरेदी सुरु होत असतानाच दर्यापूर येथे बुधवारी, १३ नोव्हेंबरपासून भारतीय कपास निगम लिमिटेडच्या (सीसीआय) वतीने कापूस खरेदी सुरु झाली आहे.

सीसीआयच्या निकषानुसार एच -४ जातीसाठी ८ टक्के आद्रर्ता (मॉइश्चर) असल्यास ७,४२१, रुपये,४ टक्के असल्यास ७,३४६.७४,. रुपये, १० टक्के असल्यास ७,२७२.५८,. रुपये,११ टक्के असल्यास ७,१४८.३७,. रुपये आणि १२ टक्के आर्द्रता असल्यास ७,१२४.१६,. रुपये प्रतिक्विंटल भाव दिला जाणार आहे. त्यामुळे सीसीआयला कापूस विक्रीसाठी तयार असलेल्या शेतकऱ्यांनी नोंदणी करावी, असे कळवण्यात आले आहे.

## मतदारसंघात सर्वाधिक उत्तम पायाभूत सुविधा निर्माण करू

**दारव्हा, दि. १८:** गेली २० वर्षे पदावर असतानाही मी मतदारसंघ कधी सोडला नाही. गुरूवार ते रविवार मी दिग्रस, दारव्हा, नेर या तिन्ही तालुक्यातील जनतेच्या अडचणी समजून घेत प्रत्येकाचे समाधान होईपर्यंत शासन, प्रशासनाकडे पाठपुरावा करत असतो. दिग्रस विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक उत्तम पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न केला असून करत राहणार आहे. भविष्यातही अनेक योजना पूर्ण करण्याचा मानस असल्याचे प्रतिपादन संजय राठोड यांनी यावेळी केले. तालुक्यातील जिल्हा परिषद मंडळ तळेगाव येथे शिवसेना-महायुतीचे उमेदवार संजय राठोड यांच्या निवडणूक प्रचारार्थ पार पडलेल्या सभेत बोलताना संजय राठोड म्हणाले .

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **MOHAMMAD AQUIB JAMEEL.** NOW MY NEW NAME IS **MOHD AQUIB JAMEEL.**
**ADD :** 44, AHBAB COLONY, OPP RMS COLONY, NAGPUR 440013

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# अंधत्त्वावर केली मात

**वयाच्या बावीसाव्या वर्षी त्याने दृष्टी गमावली. आज वयाच्या ३१ व्या वर्षी तो सत्र न्यायाधीश आहे. ब्रह्मानंद शर्मा असं या तरूणाचं नाव आहे. दृष्टी गेली तरी त्याने आत्मविश्वास हरवू दिला नाही. अनेक आव्हानांचा सामना करत त्याने हे यश मिळवलं आहे.**

ब्रह्मानंद शर्मा फक्त २२ वर्षांचा होता जेव्हा त्याला काचबिंदूचं निदान झालं. यामुळे त्याची दृष्टी गेली. दृष्टी गेली तरी त्याचा दृष्टीकोन बदलला नाही. न्यायाधीश बनण्याचं स्वप्न त्याने डोळ्यात साठवून ठेवलं होतं. हे स्वप्न तो जगला. वयाच्या ३१ व्या वर्षी तो सत्र न्यायाधीश बनला. राजस्थानातला तो पहिला अंध न्यायाधीश आहे. अजमेर जिल्ह्यातल्या सारवार तालुक्यात त्याची बदली झाली आहे. ब्रह्मानंद मूळचा भिलवाड्याचा सरकारी शाळेत त्याचं शिक्षण झालं. न्यायाधीशांच्या नेमणुकीसाठी घेतल्या जाणाऱ्या परीक्षेत तो पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण झाला. २०१३ मध्ये तो ही परीक्षा उत्तीर्ण झाला. त्याचा प्रत्येक दिवस कोर्टकचेरीच्या कामात जातो. दिवसभर तो कामात असतो. इतर न्यायाधीशांप्रमाणे तो कागदपत्रं वाचू शकत नाही. पण नंतर तो नंतर रेकॉर्डिंग



ऐकतो. यातला शब्दन शब्द तो काळजीपूर्वक ऐकतो. काही चुकू नये असा त्याचा प्रयत्न असतो. ब्रह्मानंदचं हे यश खूप मोठं आहे. त्याच्या या प्रयत्नांमधून आपण प्रत्येकाने धडा घ्यायला हवा. पण भारताच्या न्यायप्रणालीतल्या त्रुटीही यानिमित्ताने समोर आल्या आहेत. अंध व्यक्तींना या क्षेत्रात येण्यासाठी कोणत्याही सुविधा नाहीत ही बाब यानिमित्ताने समोर आली आहे. न्यायाधीश पदाच्या परीक्षेच्या निमित्ताने त्याला बऱ्याच अडचणींचा सामना करावा लागला. तो प्रशिक्षण केंद्रातही गेला. तर तिथल्या शिक्षकांनी कोणतीही मदत करायला नकार दिला. कुटुंबियांनी त्याला खूप मदत केली. त्यातही त्याला त्याच्या पत्नीची मदत मिळाली. त्याची पत्नी पुस्तकं वाचून दाखवत असे. याचं रेकॉर्डिंग केलं जायचं. मग ब्रह्मानंद हे रेकॉर्डिंग ऐकत असे.

**अचिव्हर**

परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पदभार कधी स्वीकारायला मिळणार याची तो वाट पाहत होता. त्यावेळी आधी त्याला प्रशिक्षण द्यायला हवं, असं उच्च न्यायालयाने सुचवलं. हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर २०१६ मध्ये त्याने पदभार स्वीकारला. सर्वात पहिल्यांदा तो चित्तौडगडमध्ये रूजू झाला. नंतर त्याची बदली अजमेरमधल्या सारवार तालुक्यात झाली. ब्रह्मानंदने त्याच्या कॉम्प्युटरला ई स्पीक रिडर बसवला आहे. रिडरने काढलेल्याा नोट्स यात रेकॉर्ड होतात आणि संवादाच्या रूपात सादर होतात. हे रेकॉर्डिंग ऐकून ब्रह्मानंद निकाल देतो. अपयशाची छोटी छोटी कारणं देणाऱ्यांनी ब्रह्मानंदकडून बरंच काही शिकायला हवं.




## शेर की जुबानी

* चाहे हजार शिकवे हो उनसे,
चाहे हो कई दिनोंकी बेरुखी,
बस उनकी एक झलक और छोटी सी हंसी,
फिर बस भुला देते हैं हम,
सब खुशी खुशी।

* कोशिश करो कोई आपसे
ना रूठे, जिंदगी में अपनों का
साथ ना छुटे, दोस्ती कोई भी
हो उसे ऐसे निभाओ,
की उस दोस्ती की डोर,
जिंदगी भर ना तुटे।

* कुछ उलझे हुए सवालों
से डरता है दिल, किसी को पाना कोई बडी
बात नहीं, बस दोस्तों को खोने से डरता है दिल।

## व्हॉट्स न्यू?

### स्मार्ट वॉच वापरताना...

दोस्तांनो, तुमच्याकडे स्मार्ट वॉच आहे का? मग त्यातले काही छुपे फीचर्स जाणून घेऊन अधिक चांगल्या पद्धतीने वापर करण्याचा प्रयत्न करा.



✽ स्मार्ट वॉचमधली आवडती ॲप्स पिन करता येतील. यासाठी काही सेकंद ॲपवर बोट धरून ठेवा. आता हे ॲप मेनूमध्ये वरच्या बाजूला दिसेल. त्याला स्टारही जोडला जाईल. यामुळे संबंधित ॲप पटकन सापडेल.

✽ स्मार्ट वॉच वायफायशी जोडून आवडीची ॲप्स डाऊनलोड करता येतील.

✽ स्मार्ट वॉचमध्ये आवडीच्या फीचर्ससाठी शॉर्टकट क्रिएट करता येईल.

# डेनिम जॅकेटचा स्टायलिश अंदाज

डेनिम नेहमीच फॅशनमध्ये असतं. त्यामुळे जीन्स आणि जॅकेट्स आपल्या वॉर्डरोबमध्ये हवेतच. फॅशन असो किंवा थंडीपासून बचाव करायचा असो डेनिम जॅकेट तुम्हाला सगळ्या वेळेस उपयोगी पडतं. थंडीमध्ये डेनिम जॅकेट कॅरी करण्याची संधी मिळते. हे जॅकेट वेगवेगळ्या पद्धतीने कॅरी करता येतं. हे जॅकेट कॅरी करण्याची स्टाईल तुमच्या लूकला चार चांद लावू शकते. डेनिम जॅकेट कॅरी करण्याच्या वेगवेगळ्या पद्धतींविषयी...



✽ तुमच्याकडे बरेच प्रिंटेड शर्ट असतील. थंडीत स्टायलिंगचं तंत्र जपताना अशा प्रिंटेड शर्टची मदत तुम्ही घेऊ शकता. प्रिंटेड शर्टवर डेनिम जॅकेट कॅरी करा. काळ्या पँटवर प्रिंटेड शर्ट घालून डेनिम जॅकेट कॅरी करा. बाहेर पडताना स्टायलिश गॉगल घाला.

✽ चिनोज आणि डेनिम जॅकेट हे कॉम्बिनेशनही बेस्ट आहे. डेनिम जॅकेट जीन्सवर किंवा साध्या पँटवर शोभून दिसतं असं तुम्ही समजत असाल तर ते चुकीचं आहे. हे जॅकेट चिनोजवरही शोभून दिसतं. चिनोजवर शर्ट किंवा टी शर्ट घाला. त्यावर जॅकेट परिधान करा आणि भटकंतीला निघा.

**फॅशन पॅशन**

✽ फॉर्मल पँटवरही हे जॅकेट घालता येईल. स्मार्ट कॅज्युअल्स ही संकल्पना सध्या प्रचलित आहे. ट्राउझरवर डेनिम घालून तुम्ही तुमचा लूक खुलवू शकता.

✽ वीकेंड पार्टीसाठी कूल लूक मिळवायचा असेल तर डेनिम जॅकेट आणि जॉगर्स कॅरी करा. जॉगर्सवर स्ट्राईप्सवाला टी शर्ट घाला. डेनिम जॅकेट कॅरी करा आणि मस्त दिसा.

# व्यायामाला सुरूवात करताना...

वजन कमी करण्यासाठी सगळ्यांकडून सल्ले मिळत असतात. पण वजन कमी करताना शास्त्रशुद्ध पद्धतीनेच व्यायाम केला पाहिजे. व्यायामाला सुरूवात करताना वजन कमी करण्यासाठी काय करायला हवं, ट्रेडमिलवर किती वेळ चालायला हवं, नेमकं काय खायला हवं असे प्रश्न पडू लागतात. या प्रवासाची सुरूवात करताना मनात थोडी धाकधूक असते. ही धाकधूक दूर करण्याचा हा एक प्रयत्न....

✽ वजन कमी करण्यासाठी कार्डिओ व्यायाम सर्वोत्तम आणि पुरेसा असल्याची जाहिरात केली जाते. मात्र प्रत्यक्षात हा व्यायामाची उपकरणं विकणाऱ्या कंपन्यांचा फंडा आहे. कार्डिओ व्यायामाची उपकरणं बरीच महाग असतात. त्यामुळे त्यांच्या विक्रीसाठी अशा पद्धतीचा प्रचार केला जातो. मात्र प्रत्यक्षात विविध व्यायामप्रकार उपयुक्त ठरतात.



✽ कमीतकमी वेळात जास्तीत जास्त फॅट्स जाळण्यासाठी आहार, वेट ट्रेनिंग आणि कार्डिओ यांचा समतोल साधणं गरजेचं आहे असंही सांगितलं जातं. कार्डिओमुळे वजन कमी होत असलं तरी फक्त कार्डिओवर अवलंबून राहून चालणार नाही. त्यातच बरंच वजन कमी करायचं असेल तर फक्त कार्डिओ करून भागणार नाही. धावणं, सायकलिंगसारखे व्यायामप्रकार सातत्याने करत राहिल्यास शरीर या तुलनेने कमी तीव्रतेच्या व्यायामप्रकारांशी जुळवून घेतं आणि कमी कॅलरी खर्च होतात.


**फिटनेस**

✽ वजन लवकर कमी करायचं असेल तर किक बॉक्सिंग, स्प्रिंटिंगसारखे अधिक तीव्रतेचे कार्डिओ व्यायाम करता येतील. यामुळे स्ट्रेंथ ट्रेनिंगही होतं आणि वजन कमी करण्याला गती मिळते.

✽ वजन कमी करायचं असलं तरी अतिव्यायाम करू नये. शरीराला विश्रांती न देताना सतत व्यायाम करत राहिल्यामुळे शारीरिक आरोग्य धोक्यात येतं. शिवाय मानसिक आरोग्यावरही परिणाम होतो. स्नायूंमध्ये वेदना होणं, भूक मंदावणं, डोकेदुखी, रोगप्रतिकारकक्षमता कमी होणं असे दुष्परिणाम समोर येतात.

# वादांना वैतागलोय

माझं एका मुलीवर चार वर्षांपासून प्रेम आहे. पण सध्या आमच्या आयुष्यात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. मी कामानिमित्ताने जर्मनीत असतो. पुढची तीन वर्षं इथेच राहणार आहे. मी वेळ देत नाही, असा तिचा समज झाला आहे. ती माझ्यावर चिडलेली असते. खूप कठोरपणे वागते. ताणतणाव, अस्वस्थता अशा मानसिक विकारांनी तिला ग्रासलं आहे. ती या सगळ्यासाठी मला दोष देते आहे. मला काही काळासाठी एकटं सोड, असं तिने मला सांगितलं आहे. अर्थात तिला किती वेळ एकटं रहायचं आहे हे मला माहीत नाही. ती माझ्याशी बोलत नाही. मी तीन वर्षांनी भारतात परतल्यानंतर आम्ही लग्न करणार होतो. पण सध्या आमच्यात तणाव निर्माण झाला आहे. आमच्यात सध्या संपर्क नाही. या सगळ्याचा मला खूप ताण आला आहे.



मी अस्वस्थ झालो आहे. मी काय करू?

**उत्तर** : तुम्हा दोघांमध्ये सध्या संपर्क होऊ शकत नाही. तू सध्या कोंडीत सापडला आहेस. संपर्काशिवाय ही कोंडी फुटणार नाही. त्यामुळे तू तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न कर. तिने तुला बोलायला मनाई केली असली तरी मेसेज, व्हॉट्स ॲप, ई मेलच्या माध्यमातून तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न कर. तू मित्रमैत्रिणींना मध्यस्थी करायला सांग. तुम्हा दोघांना ओळणाऱ्या मित्रमैत्रिणींना तिच्याशी संपर्क करायला सांग. तिच्याशी संपर्क झाला तरच तुमच्या नात्याची गाडी पुढे सरकेल. तू तिच्याशी बोल. तिच्या अपेक्षांविषयी जाणून घे. तुझ्या कामाच्या स्वरुपाविषयी सांग. तीन वर्षांनंतर परत आल्यावर आपण लग्न करू आणि तुझं तिच्यावर खूप प्रेम असल्याचं तिला समजावून सांग. तिची मनधरणी करण्याचा प्रयत्न कर. ही कोंडी संवादामुळेच सुटू शकेल.

**मॅच मेकिंग**

## ॲप वर्ल्ड

### खरेदी स्मार्ट स्पीकर्सची

✽ स्मार्ट स्पीकरना इंग्रजी भाषेत कमांड द्यावी लागते. आपले उच्चार या स्पीकरला कळत नाहीत. त्यामुळे स्पीकर खरेदी करण्याआधी तो वापरून बघा.



✽ बऱ्याच स्मार्ट स्पीकर्सना वायफायची गरज असते. त्यामुळे तुमच्या घरी वायफाय असेल तरच असे स्पीकर विकत घ्या.

✽ गाणी ऐकण्यासाठी स्पीकर खरेदी करत असाल तर स्मार्ट स्पीकरऐवजी साधा स्पीकर घ्या.

✽ स्मार्ट स्पीकर चालवण्यासाठी ॲपची गरज असते. त्यामुळे तुम्हाला फोनमध्ये ॲप डाउनलोड करावं लागेल.

या सगळ्या गोष्टींचा विचार करूनच मग स्मार्ट स्पीकर घ्या

## स्मार्ट टिप्स

### बंद लॅपटॉपने करा मोबाईल चार्ज

दोस्तांनो, बंद लॅपटॉपचा वापर करूनही तुम्ही मोबाईल चार्ज करू शकता. यासाठी माय कॉम्प्युटर–फाईल मॅनेजर–प्रॉपर्टीज या ऑप्शनमध्ये जा. मग कंट्रोल पॅनेल–होम डिव्हाइस मॅनेजरची निवड करा. आता तुम्हाला वेगवेगळे ऑप्शन्स दिसतील. त्यातल्या युनिव्हर्सल सिरियल बस कंट्रोलर्स हा पर्याय निवडा. आता यूएसबी रूट हबवर क्लिक करा. आता प्रॉपर्टीज–पॉवर मॅनेजमेंटमध्ये जा. आता अलाउ द कॉम्प्युटर टू टर्न ऑफ धीस डिव्हाइस टू सेव्ह द पॉवर हा ऑप्शन डिसेबल करा. आता लॅपटॉप बंद असेल तरी तुम्ही फोन चार्ज करू शकता.



# चलो, निकल पडो

मित्रांनो, हिवाळ्यात भटकंतीची मजाच न्यारी. त्यात बरोबर धमाल मित्र असतील तर विचारायलाच नको. आता भटकंती करायची तर ठिकाणंही खास हवीत. काही ठिकाणी मुलांची गँग खूप धमाल करू शकते. तुम्हीही मित्रांसोबत भटकंतीला निघण्याच्या तयारीत असाल तर या ठिकाणांचा नक्कीच विचार करा.

✽ लडाख ट्रिपला निघा. डिसेंबर–जानेवारीमध्ये लडाख गोठलेलं असतं. पण थंडी कमी झाल्यावर तुम्ही लेह–लडाखला जाऊ शकता. बाईक किंवा कारने लेह–लडाखला जाता येईल. मस्तपैकी मजा मस्ती करत, निसर्गसौंदर्य न्याहाळत तुम्ही भटकंती करू शकाल.

✽ ऋषीकेश हे अत्यंत पवित्र स्थान आहे. ऋषीकेश हे शांत आणि धार्मिक स्थान आहे. इथे गेल्यावर मन:शांती मिळू शकेल. महानगरातल्या धकाधकीच्या जीवनातून काही काळ ब्रेक घ्यायचा असेल तर ऋषीकेशची सैर करा.

**भटकंती**


✽ डिसेंबर–जानेवारी महिन्यात हिमाचल प्रदेशची सैर करता येईल. या दिवसात इथे बर्फ पडतो. सिमला, कुलू–मनालीशिवाय इथे इतरही बरीच ठिकाण आहेत. इथे शांत आणि निवांत क्षण अनुभवता येतील.

✽ या दिवसात समुद्रकिनाऱ्यांची सफर करता येईल. कोकण, कर्नाटकचा किनारी भाग, तमिळनाडू, केरळ या राज्यांचा दौरा करता येईल. गोवा हा सुद्धा खूप चांगला पर्याय आहे. त्यामुळे आपला ग्रुप जमवा आणि भटकंतीला निघा.



# रोवा वाहतूक सेवेची मुहूर्तमेढ

दोस्तांनो, सध्या खूप शिकूनही मनासारखी नोकरी मिळत नाही. एखादी नोकरी मिळालीच तर पगार कमी असतो. अशावेळी स्वत:चा एखादा व्यवसाय सुरु करण्याची कल्पना वाईट नाही. उद्योग–व्यवसायाची सुरूवात करताना संघर्ष करण्याची तयारी ठेवायला हवी. तुम्हाला लगेच यश मिळत नाही. पण एकदा यश मिळाल्यावर तुम्ही चांगलं उत्पन्न मिळवू शकता.



सध्या ट्रॅव्हल अँड टूरिझमला चांगले दिवस आले आहेत. तुम्ही वाहन चालवू शकत असाल तर हा व्यवसाय सुरू करता येईल. सध्या लोकांना एका शहरातून दुसऱ्या शहरात जाण्यासाठी गाडी लागते. सहलींसाठीही गाड्यांची गरज असते. त्यामुळे सुरूवातीला तुम्ही तुमच्याकडच्या गाडीने सुरूवात करू शकता. तुमचं चांगलं नाव झाल्यावर पुढे जाऊ शकता. नव्या गाड्या खरेदी करून व्यवसाय वृद्धी करता येईल. वाहतूक सेवा क्षेत्र आज वेगाने विस्तारत आहे. व्यवसायिक कारणांमुळे प्रवास करणाऱ्यांची संख्याही खूप मोठी आहे. या माध्यमातून तुम्ही चांगलं उत्पन्न मिळवू शकता. छोट्या प्रमाणावर सुरूवात करून विस्तार करू शकता. ओला, उबेरसारख्या कंपन्याही संधी देत आहेत. या माध्यमातून तुम्ही प्रवासी जोडू शकता आणि स्वतंत्र व्यवसायची मुहुर्तमेढ रोवू शकता.

**स्वयंरोजगार**

## स्मार्ट ट्रिक्स


### वायफाय 'स्लो' झालंय?

घरातल्या वायफायची गती कमी झाली की डाउनलोडिंग होत नाही. व्हिडिओ बघता येत नाहीत. अशा परिस्थितीत वायफायची गती वाढवण्यासाठी काही उपाय करता येतील. योग्य फ्रिक्वेंसी निवडा. वायफायचं फर्मवेअर अपडेट करा. सॉफ्टवेअरचं अपटेड पेंडिंग असेल तर समस्या निर्माण होऊ शकतात. सिग्नलशी संबंधित समस्या असतील तर रिपीटर्सचा वापर करू नका.




# चटपटीत मटार चाट

मित्रांनो, चाटचे प्रकार सगळ्यांनाच आवडतात. पण नेहमीच्या या चाटमध्ये काही प्रयोग करून पाहायला हवेत. आता मटारचा हंगाम सुरू होईल. चला तर मग, मटार चाटची रेसिपी जाणून घेऊ.



**साहित्य** :पाव किलो मटारचे दाणे, दोन कांदे, दोन टोमॅटो, दोन ते तीन हिरव्या मिरच्या, एक इंच आलं, चमचाभर हळद, चाट मसाला, जीरेपूड, लाल तिखट, मीठ, चिंचेची चटणी, दही, शेव आणि कोथिंबिर

**कृती** : मटार उकडून घ्या. हे मटार भांड्यात काढून घ्या. आता प्रत्येक प्लेटमध्ये प्रत्येकी दोन चमचे मटार घाला. त्यावर चिरलेला कांदा,टोमॅटो, हिरवी मिरची, किसलेलं आलं, चाट मसाला, लाल मिरची, जिरेपूड आणि मीठ घाला. त्यावर थोडी शेव घाला. मग चिंचेची चटणी, दही घाला. कोथिंबिरीने सजवा. मटार चाट तयार आहे. एखाद्या संध्याकाळी हा बेत करता येईल.

**झटपट रेसिपी**




# सावनेरमध्ये देवेंद्र फडणवीस केदारांवर बरसले...

## लोकप्रतिनीधींच्या छत्रछायेत फोफावले अवैध धंदे

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :** सुनील केदारांनी तरुणांना सट्टयाचा, वाळू चोरीचा रोजगार दिला, अशी टीका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. सुनील केदार इतके वर्ष या मतदारसंघाचे आमदार राहिले. त्यांच्या कार्यकाळात सावनेर मतदारसंघाची काय अवस्था आहे, हे मी सांगण्याची आवश्यकता नाही, असेही फडणवीस म्हणाले.

संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात मी जाऊन आलोय. महाराष्ट्राचा अंदाज मला आला आहे. २३ तारखेला महाराष्ट्रामध्ये पुन्हा एकदा महायुतीचे सरकार येणार, ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. पण या सरकारमध्ये सावनेरचा आमदार असणार की नाही? असा सवाल फडणवीस यांनी केला.

परिवर्तनाची यापेक्षा मोठी संधी तुम्हाला जन्मात मिळणार नाही. आता चुकलात तर पक्षातापाशिवाय काहीही हातात राहणार नाही, असेही फडणवीस म्हणाले.



नितीन गडकरींच्या नेतृत्वात केंद्र आणि महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून आम्ही नागपूर शहर आणि नागपूर जिल्ह्याचा चेहरामोहरा बदलला आहे. मात्र, नागपूर जिल्ह्यातील १२ मतदारसंघापैकी सावनेर मतदारसंघ मागास राहिला आहे, असा आरोप फडणवीस यांनी केले. आपण विकास केला तर लोक प्रश्न विचारतात, हे येथील आमदारांना माहीत होते, त्यामुळे विकास करण्याऐवजी लोकांना दडपण्याचे काम त्यांनी केले.

याठिकाणी विकासाचे नाही, तर दादागिरीचे राजकारण झाले, असाही आरोप देवेंद्र फडणवीस यांनी केला. सुनील केदार यांनी सावनेरमध्ये तरुणांना सट्टयाचा, वाळू चोरीचा रोजगार दिला, त्यामुळे आज येथे मोठ्या प्रमाणात अवैध होताना दिसत आहेत. माझ्या पोलिसांना अवैध धंद्यांबाबत सावनेर मतदारसंघात सर्वात जास्त त्रास आहे, असा दावा फडणवीस यांनी केला. या अवैध धंद्यांना लोकप्रतिनिधींचा आशीर्वाद आहे, अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी या सभेदरम्यान केली.

### डीसीसी बँकेच्या घोटाळ्यावरून निशाणा


ज्या जिल्ह्यांच्या जिल्हा बँक जिवंत आहेत, असेच जिल्हे पुढारले आहेत. पुणे, सातारा सारखील जिल्हा बँक स्वतःच्या भरवशावर शेतकऱ्यांना ३ लाखापर्यंतचे कर्ज शून्य टक्के व्याजदरावर देते. सोबतच कारखान्यांना १०० कोटी रुपयांपर्यंत कर्ज देऊन कृषी क्षेत्रातील कारखाने मोठ्या प्रमाणात उभारते. पण आपल्या जिल्ह्यातील डीसीसी बँक मेली. त्या डीसीस बँकेसोबत शेतकरी आणि खातेदारांची स्वप्ने मेली. कृषी आधारीत अर्थव्यवस्था पूर्ण संपली. हा बँकेचा घोटाळा केला कुणी? शेतकऱ्यांचे आणि गरिबांचे शेकडो कोटी रुपये बुडाले. यामागे कोणाचा हात आहे? असा सवाल केला. फडणवीस यांनी केला.

# दक्षिण नागपूरमध्ये समानसंधी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :** दक्षिण नागपूर मतदारसंघात तिस ?यांदा रिंगणात असलेले भाजपचे विद्यमान आमदार मोहन मते यांच्यासमोर काँग्रेसचे गिरीश पांडव यांचे तगडे आव्हान आहे. मात्र, वंचित बहुजन आघाडी आणि बसपाचे उमेदवार किती मते घेतात यावरच त्यांचे भवितव्य अवलंबून आहे. असे असले तरी भाजपचे मते आणि काँग्रेसचे पांडव यांना समसमान संधी असल्याचे सध्याचे चित्र आहे.

मोहन मते आणि गिरीश पांडव यांनी प्रचारसभा, प्रचार मिरवणुकांच्या माध्यमातून जोरदार प्रचार केला. याशिवाय अनेक वस्त्यांमध्ये दुचाकीने आणि पायी फिरून मतदारांना आर्जव केला. मते यांचा भर पक्षातील मोठे नेते आणि स्टार प्रचारकावर राहिला आहे. तर पांडव यांनी मतदारांच्या प्रत्यक्ष संपर्कावर भर दिला. गेल्या निवडणुकीतील अल्पमताने पराभव झाल्याने पांडव यांनी यावेळी चूका दुरुस्त करण्यासाठी कोणतीही कसर ठेवलेली नाही. त्यांनी युवक आणि महिला कार्यकर्त्यांची फौज अतिशय कुशलतेने कामाला लावली.

मोहन मते सत्ताधारी पक्षाचे आमदार असल्याने आणि नासुप्रचे विश्वस्त असल्याने त्यांना काही विकास कामे दाखवण्याची संधी मिळाली. तसेच त्यांची कार्यकर्त्यांना उपलब्ध होणारा नेता म्हणून ओळख ही जमेची बाजू आहे. तर शिक्षण क्षेत्रात काम करणारे गिरीश पांडव हे काँग्रेसकडून दुसऱ्यादा



लढत आहेत. त्यांनी मागील पाच वर्षे मतदारांशी संपर्क ठेवला आहे. त्यांचे मितभाषी असणे आणि प्रतिस्पर्धी उमेदवाराच्या वादग्रस्त प्रतिमेचाही त्यांना फायदा होण्याची शक्यता आहे.

येथे सुमारे १९ ते २० टक्के अनुसूचित जातीचे मतदार आहेत. मात्र,वंचित बहुजन आघाडीचे सत्यभामा लोखंडे आणि बसपच्या विश्रांती झामरे यांच्याकडून संभावित मतविभाजन रोखण्याचे आव्हान त्यांच्या समोर आहे. मात्र, त्यांना ८ टक्के असलेला मुस्लीम मतदारांचा पाठिंबा मिळण्याची शक्यता आहे. तसेच झोपडीबहुल भागांतून प्रतिसादाबद्दल त्यांना आशा आहे. या पार्श्वभूमीवर मते आणि पांडव अतिशय चुरशीची लढत होण्याची शक्यता असून अगदी एक ते दोन टक्क्याने विजयी उमेदवारांचे भवितव्य निश्चित होण्याची शक्यता दिसून येत आहे.







■ **नागपूर :** विधानसभा निवडणुकीसाठी संपूर्ण यंत्रणा सज्ज झाली असून, बुधवार २० रोजी मतदान होऊ घातले आहे. तथापि, नागपूर येथील म्हाडा कॉलनीतील रहिवाशांनी मतदानावरच बहिष्कार घातला आहे या वसाहतीजवळ अनधिकृत सिमेंट काँक्रिट प्लॅन्ट चालविले जात असून, त्यामुळे येथील दीड हजारांवर रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याकडे दुर्लक्ष होत असल्याने भला मोठा फलक लावत नागरिकांनी बहिष्कार असल्याचे स्पष्ट केले आहे.

# जिकडं म्हातारं फिरतंय, तिकडं चांगभलं हुतंय

## प्रतिभा पवारांच्या हातातील फलकाने वेधलं बारामतीकराचं लक्ष

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १८ :** विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा आज शेवटचा दिवस असून सर्व नेत्यांनी आपापल्या मतदारसंघात सांगता सभांचं आयोजन केलं होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष व ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी त्यांच्या पक्षाचे बारामतीचे उमेदवार युगेंद्र पवार यांच्यासाठी बारामतीत सभेचं आयोजन केलं होते. यंदाच्या निवडणुकीतील शरद पवारांची ही सांगता सभा होती.

बारामतीत शरद पवारांच्या पक्षाने सांगता सभेची जोरदार तयारी करण्यात आली होती . या सभेला पक्षातील अनेक नेते, आमदार, खासदार उपस्थित आहेत. खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह शरद




पवारांच्या पत्नी प्रतिभा पवार देखील सभेला उपस्थित होते. यावेळी प्रतिभा पवार यांच्या हातातील एका फलकाने सर्वांच लक्ष वेधले.

बारामतीमधील प्रचारसभेवेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या एका कार्यकर्त्याने आणलेला फलक प्रतिभा पवारांनी आपल्या हाती घेतला. या फलकावर लिहिलेल्या मथळ्याने सर्वांच लक्ष वेधून घेतलं आहे. जिकडं म्हातारं फिरतंय, तिकडं चांगभलं हुतंय, असा मथळा त्या फलकावर लिहिला आहे. एका कार्यकर्त्याने बनवून आणलेला हा फलक प्रतिभा पवार यांनी त्यांच्या हातात घेऊन उंचावला.

दरम्यान, सोशल मिडीयावरही दिवसभर याच फलकाची राज्यभरात चर्चा होती.

# बलात्कार करुन तरुणीचा खून

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १८ :** उमरेडमध्ये एक तरुणीवर प्रियकराने बलात्कार करुन तिचा खून केला .तरुणीचा मृतदेह आढळल्यामुळे खळबळ उडाली आहे.

ही घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली असून या प्रकरणी उमरेड पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध बलात्कार आणि खुनाचा गुन्हा दाखल केला. पूजा (२२, रा. उमरेड) असे खून झालेल्या तरुणीचे नाव आहे. लोकेश जुगनाके (३०, रा. अड्याळ) असे आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पूजा ही उमरेडमध्ये बीएसडब्ल्यू पदवीच्या द्वितीय वर्षाला शिकत होती. तिचे इंस्टाग्रामवरुन लोकेश जुगनाके या युवकाशी सूत जुळले. लोकेश हा मोठमोठ्या हॉटेलमध्ये स्वयंपाकी (कूक) म्हणून काम करतो.

दोघेही गेल्या दीड वर्षांपासून एकमेकांच्या संपर्कात होते. यादरम्यान, त्यांचे प्रेमसंबंध निर्माण झाले. दोघांच्या वेळोवेळी भेटी होत होत्या. पूजाला त्याने लग्नाचे आमिष दाखवले होते. नवीन वर्षात दोघेही लग्न करणार होते. त्यामुळे पूजा खूप खूश होती.

### मृतदेह आढळल्याने खळबळ

पूजाने शारीरिक संबंधास नकार देत घरी नेऊन मागितले होते. मात्र, लोकेशने तिच्यावर बलात्कार केला. त्यामुळे ती दुःखी झाली. लोकेशने माझा रेप केला. त्याला शिक्षा झाली पाहिजे. त्याने माझा विश्वासघात केला. मी प्रेम केले पण त्याने माझ्यावर फक्त शारीरिक संबंधासाठी प्रेम केले. पूजाने हातावर पेनाने लिहून ठेवले आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

रविवारी लोकेशने तिला नेहमीप्रमाणे फिरायला जाण्यासाठी आग्रह केला. तिनेही होकार दिला. रविवारी सायंकाळी ते दोघेही एमआयडीसीकडे जाणाऱ्या महामार्गाने दुचाकीने फिरायला गेले होते. रात्र होताच पूजाने त्याला घरी सोडण्यास सांगितले.

मात्र, लोकेशच्या मनात काहीतरी वेगळेच होते. त्याने महामार्गावरील एका बसस्टॉपवर नेले. तेथे तिला शारीरिक संबंधाची मागणी केली. मात्र, तिने नकार दिला. त्यामुळे लोकेशने तिच्याशी बळबजरी शारीरिक संबंध प्रस्थापित केले.

या प्रकारामुळे पूजाला संताप आला. दोघांचा वाद झाला. रागाच्या भरात लोकेशने पूजाचा ओढनीने गळा आवळून खून केला. तिचा मृतदेह बसस्टॉपमध्येच फेकून त्याने पळ काढला.

सोमवारी सकाळी हा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी ठाणेदार धनाजी जळक यांनी हत्याकांड आणि बलात्काराचा गुन्हा दाखल केला. ही घटना उघडकीस आल्यानंतर पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी घटनास्थळाला भेट दिली. फरार आरोपी लोकेशच्या शोधासाठी पथके तैनात करुन रवाना केले.

# प. महाराष्ट्रात महायुतीस ४५ जागा

## केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांचा विश्वास

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १८ :** पश्चिम महाराष्ट्रात महायुतीचे ४२, तर महाविकास आघाडीचे १६ आमदार आहेत. त्यात भर टाकून आम्ही यंदा पश्चिम महाराष्ट्रात ४५ जागा निवडून आणू, असा विश्वास केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सोमवारी येथे आयोजित पत्रकार परिषदेत केला.

लोकसभा निवडणुकीत आमच्या दहा जागा कमी झाल्या पण विरोधक यांचे फेक नरेटिव्ह संभ्रम दूर करू शकलो. पश्चिम महाराष्ट्रात भाजप २६ जागा, शिवसेना १२, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष १९ जागा आणि जनसुराज्य पक्ष दोन जागा लढत आहे. आम्ही जे काम करणार आहे आणि केलेले काम जनते समोर ठेवले आहे.

जनता सुज्ञ असून त्यांना काम करणारे कोण आहे हे बरोबर माहिती आहे, असे मुरलीधर मोहोळ म्हणाले. यावेळी त्यांच्यासोबत भाजप प्रदेश महामंत्री राजेश पांडे, भाजप प्रवक्ते संदीप खर्डेकर, संजय मयेकर, पश्चिम महाराष्ट्र माध्यम प्रमुख अमोल कविटकर , उमेश चौधरी, पुष्कर तुळजापूरकर, हेमंत लेले, प्रशांत कोतवाल उपस्थित होते.

मोहोळ म्हणाले, राज्यातील प्रचारास आज विश्रांती मिळत असून २० नोव्हेंबर रोजी जनता कोणाला कौल देईल उत्सुकता सर्वांना आहे. पश्चिम महाराष्ट्रात एकूण ५८ मतदारसंघ आहे. शहर आणि ग्रामीण भागात महायुती उमेदवारांना चांगला प्रतिसाद आहे. मागील निवडणुकीत युतीला स्पष्ट जनादेश जनतेने दिला पण उध्दव ठाकरे आघाडी सोबत गेले आणि अनादर करत सत्ता स्थापन केली. ठाकरे यांनी गद्दरी करत लोकशाहीचा अपमान केला. पण अडीच वर्षात जनतेच्या मनात नियतीने जे होते तेच झाले.

युतीच्या काळात विकासाला गती मिळाली आणि विविध पायाभूत सुविधा निर्माण झाल्या. सर्वाधिक परकीय गुंतवणूक देखील आली, असे मोहोळ म्हणाले.



# महासागर नागपूर वृत्तसागर

■ मंगळवार, दि. १९, नोव्हेंबर २०२४ ■


## माजी गृहमंत्री आणि काटोलचे उमेदवार

# अनिल देशमुखांवर हल्ला

## ताफ्यावर दगडफेक, डोक्याला दुखापत

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. १८ :



माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या ताफ्यावर तूफान दगडफेक करण्यात आली आहे. या घटनेत अनिल देशमुख यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, काटोल येथे प्राथमिक उपचारानंतर त्यांना नागपूर येथे हलविण्यात आले आहे.

अनिल देशमुख काटोल मतदारसंघातून विधानसभेची निवडणूक लढवित आहेत. शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ते उमेदवार आहेत. सोमवारी प्रचाराचा अखेरचा दिवस होता.

नरखेड येथील सभा आटोपून काटोल येथे तीनखेडा भिष्णुर मार्गाने परत येत असताना काटोल जलालखेडा रोडवरील बेलफाट्याजवळ काही गुंडप्रवृत्तीच्या लोकानी त्यांच्या गाडीवर मोठ्या प्रमाणात दगडफेक करत जीवघेणा हल्ला केला. गाडीच्या काचा फोडल्या.

यात अनिल देशमुख हे गंभीर जखमी झाले असून त्यांना पुढील उपचाराचा करिता काटोलच्या रुग्णालयात आणण्यात आले. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, ग्रामीण रुग्णालयात उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी नागपूर पाठवण्यात आले. दरम्यान, अनिल देशमुख यांच्यावर प्राणघातक हल्ला झाल्याचे वृत्त पसरताच त्यांच्या समर्थकांनी रूग्णालयात प्रचंड गर्दी केली होती. विरोधी गटाकडून हा हल्ला झाल्याचे बोलले जात असून, पोलीस तपास करीत आहेत.





देशमुख यांच्यावर झालेल्या हल्ल्यात त्यांच्या कारचे काच फुटले. काचांचा असा सडा पडला होता. ग्रामीण रूग्णालयासमोर त्यांच्या समर्थकांनी अशी गर्दी केली.

# विधानसभा निवडणूकीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज

* ३९ कोटी ६० लाखाचे साहित्य जप्त
* दिव्यांगांसाठी सुविधा
* प्रत्येक मतदान केंद्र निगराणीखाली

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :



विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 साठी अवघे काही तास उरले असून मतदानासाठी निवडणूक विभाग योग्य त्या सर्व सुरक्षा यंत्रणांसह सज्ज झाली आहे. प्रत्येक मतदाराला निर्भय वातावरणात आपला मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी विशेष खबरदारी घेण्यात आली आहे. नागपूर जिल्ह्यातून सर्वाधिक मतदान व्हावे यासाठी नागपुरकरांसह जिल्ह्यातील मतदार न चुकता मतदान करतील, असा विश्वास जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी व्यक्त केला.

विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, अतिरिक्त ग्रामीण पोलिस अधीक्षक रमेश धुमाळ, उपजिल्हा निवडणूक अधिकारी प्रवीण महिरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने 4 हजार 631 मतदान केंद्रांवर विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. सूमारे 3 हजार 460 मतदान केंद्राचे वेबकास्टिंग केले जाणार आहे. शहरी भागात 2 हजार 169 म्हणजेच 100 टक्के मतदान केंद्राचे वेबकास्टिंग होईल. ग्रामीण भागातील 53 टक्के मतदान केंद्र म्हणजेच 1 हजार 291 मतदान केंद्रावर वेबकास्टिंग होणार असल्याची माहिती डॉ. विपीन इटनकर यांनी दिली.

जिल्ह्यात सूमारे 127 मतदान केंद्र संवेदनशील (क्रिटिकल) मतदान केंद्र म्हणून घोषीत करण्यात आले असून या ठिकणी मॉयक्रो ऑब्झर्व्हर नियुक्त करण्यात आले आहेत. याच बरोबर या ठिकाणी खबरदारीचा उपाय म्हणून केंद्रीय सशस्त्र पोलीस बल तत्पर ठेवण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

आदर्श आचार संहितेअंतर्गत सुरक्षिततेच्या उपाययोजना घेतल्यानुसार सीमेवर नाकाबंदी करण्यात आली आहे. आजवर केलेल्या विविध कारवाईमध्ये जिल्ह्यात 39 कोटी 60 लाख कोटी रुपयांचे साहित्य व काही रोख रक्कम जप्त करण्यात आली. यात दागिने, रोख रक्कम, मद्य, राशन किट आदींचा समावेश असल्याचे ते म्हणाले.

दिव्यांगांसाठी मतदान केंद्रांवर आवश्यक सोईसुविधा पुरविण्यात आल्या आहेत. ज्या ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांना मतदान केंद्रावर जाण्यास असमर्थता आहे अशा व्यक्तींसाठी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयामार्फत हेल्पलाईन क्रमांक जाहीर करण्यात आले आहे. यात 8329131808 व 8623825845 या क्रमांकांवर संपर्क साधता येईल. विधानसभा मतदारसंघासाठी यंदा प्रथम चक्रीका या ॲपचा वापर करण्यात येणार आहे. कर्मचारी व अधिकारी यांचा त्यांच्या जीपीएससह समन्वय ठेवता येणे शक्य होणार आहे.

# नवलाई शहरस्तरीय संस्थेद्वारे बचत गटांचे संचलन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

मनपा नागपूरच्या संचलनाखाली स्थापित नवलाई शहरस्तरीय संस्थेअंतर्गत (सिटी लेवल फेडरेशन) 25 वस्तीस्तरीय संस्था (एरिया लेवल फेडरेशन) कार्यरत असून यामार्फत बचत गटांची स्थापना करून त्या बचत गटांना व्यवसायीक व लोन विषयक मार्गदर्शन करून महिलांना स्वयंपूर्ण बनविण्याच्या दिशेने व बेरोजगार युवकांसाठी रोजगार मिळावे घेऊन त्यांना रोजगाराच्या संधी मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण सामाजिक दायित्वाचे कार्य कोणताही नियमित मोबदला न घेता तीन वर्षांपासून केले जात आहे.

नवलाई शहर स्तरीय संस्था ही मनपाच्या आदेशानुसार कार्यान्वित असून ही संस्था 25 वस्तीस्तरीय संस्थांचे संचालन करते. प्रत्येक वस्तीस्तरीय संस्थेमध्ये 150 बचत गट आहेत. असे जवळपास 3750 बचत गट स्थापन करण्यात आलेली आहे.

आतापर्यंत शिलाई, ब्युटी पार्लर, अगरबत्ती, मोमबत्ती बनविणे तसेच टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनवणे व कापडी पिशव्या बनविणे, राष्ट्रध्वज बनविणे याबाबत ट्रेनिंग देण्यात आलेले आहेत. यासाठी त्यांना लागणाऱ्या लोन विषय सविस्तर मार्गदर्शन करण्यात आलेली आहे. यातूनच महिलांनी लोणची, पापड, साबण, सर्फ, खत बनविणे यासारखे उद्योग स्वतःच्या भरोशावर सुरू केले आहे. या खेरीज बेरोजगार युवकांसाठी रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी आतापर्यंत चार रोजगार मिळावे आयोजित करण्यात आले होते व युवकांना त्यांच्या शैक्षणिक व कौशल्यावर आधारित रोजगार प्राप्त झाले.

याही पलीकडे जाऊन नवलाई शहर स्तरीय संस्थेमार्फत बेघरांना बेघर निवारा केंद्रात दाखल करून त्यांना जीवन कौशल्यावर आधारित मार्गदर्शन केले जाते. या दोन्ही संस्थांचे वैशिष्ट्य म्हणजे ही सामाजिक उपक्रमे कोणताही नियमित मोबदला न घेता केली जातात. केवळ येथील समन्वयकांना बचत गट स्थापनेचे दोन हजार रुपये व स्थापित करण्यात आलेल्या नर्सरीतून त्यांना आर्थिक उत्पन्न होते. अशी माहिती एंजल महिला बचत गटाच्या संचालिका व नवलाई शहर संस्थेच्या सचिव सुषमा भोवते यांनी दिली.

# एटीएममध्ये चोरी करताना दोघांना पकडले

### मौजमज्जेसाठी करीत होते चोरी

आरोपी गत काही महिन्यांपासून सतत एटीएमला लक्ष्य करीत होते. एटीएम मशीनच्या कॅश बॉक्समध्ये ॲल्यूमिनियमची पट्टी अडकवून ठेवत होते. लोक एटीएममध्ये जाऊन आपला व्यवहार करायचे मात्र पैसे बाहेर येत नव्हते. आरोपी ते गेल्यानंतर लगेच एटीएममध्ये जाऊन बॉक्समध्ये अडकलेले पैसे काढून घेत होते.

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

एका तरुणाच्या सतर्कतेने नंदनवन पोलिसांनी एटीएममध्ये चोरी करणाऱ्या दोन आरोपींच्या मुसक्या आवळल्या. दोघेही एटीएममध्ये पट्टी अडकवून पैसे काढत होते. ऋतिक गणेश मेश्राम (24) रा. चंदननगर आणि तेजस नरेंद्र गजभिये (23) रा. सिरसपेठ अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. इश्वरनगर परिसरात राहणारा शुभम रामभाऊ चोपकर (28) हा तरुण रविवारी सायंकाळी गुरूदेवनगरातील सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेला होता. त्याने मशीनमध्ये कार्ड टाकून 1500 रुपये काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पैसे बाहेर आले नाही. तो एटीएममधून बाहेर आला असता ऋतिक आणि तेजस संशयास्पदरित्या उभे दिसले. शुभम बाहेर निघताच आरोपी मशीनमधून पैसे काढण्याचा प्रयत्न करू लागले. शुभमचा संशय बळावला. त्याने तत्काळ नियंत्रण कक्षाला माहिती दिली. नंदनवन पोलिस घटनास्थळी पोहोचले. दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्यांच्याजवळ ॲल्यूमिनियमची पट्टी आणि रोख 6,300 रुपये मिळाले. आरोपींनी एटीएमपासून काही अंतरावरच त्यांची एमएच-49/बीडब्ल्यू-5621 क्रमांकाची कार उभी केली होती. कार आणि मोबाईलसह 2 लाख 24 हजार रुपयांचा माल जप्त केला.

# मेटाडोरच्या धडकेत इसम ठार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :

मेटाडोर चालकाच्या निष्काळजी पणामुळे एका ढोल वादकाला त्याचा जीव गमवावा लागला. ही घटना सीताबर्डी पोलिस ठाण्यांतर्गत धरमपेठ परिसरात घडली. प्रशांत नारायण मसराम (40) रा. बाभुळगाव, यवतमाळ असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी मेटाडोअर चालक महेश श्रीकृष्ण डिके (51) रा. धामणगाव, यवतमाळ विरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

प्रशांत यवतमाळच्या न्यू स्टार बॅण्डमध्ये ढोल वाजवत होते. शनिवारी प्रशांत सहकाऱ्यांसोबत महेशच्या एमएच-29/टी-1686 क्रमांकाच्या वाहनाने नागपूरला आले होते. धरमपेठच्या झेंडा चौकाजवळ सर्व आराम करीत असताना महेशने निष्काळजीपणे त्याचे वाहन मागे घेतले. यात जबर धडक लागल्याने प्रशांत गंभीर जखमी झाले.

सहकाऱ्यांनी त्यांना उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. पोलिसांनी प्रशांतचे सहकारी नीकेश कवाडे यांच्या तक्रारीवरून चालम महेशविरुद्ध गुन्हा नोंदवून त्याला अटक केली आहे. पुढील तपास पोलीस करीत आहे.

## अभ्यंकर नगर टी-पॉईट येथे जनजागृती

**नागपूरः** नागपूर महानगरपालिका आणि ग्रीन व्हिजील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पौर्णिमा दिवस अभियानांतर्गत शुक्रवारी रात्री अभ्यंकर नगर टी-पॉईंट (व्हीएनआयटी गेट) परिसरात जनजागृती करण्यात आली. याप्रसंगी ग्रीन व्हिजिल फाऊंडेशनचे कौस्तव चॅटर्जी, सुरभी जयस्वाल, शीतल चौधरी, बिष्णुदेव यादव, प्रिया यादव, श्रीया जोगे, तुषार देशमुख, बनिक आदींनी परिसरात जनजागृती केली.

# सबका विश्वास सबका विकास हेच आमचे ध्येय : नितीन गडकरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :




नागपूर एज्युकेशन हब झाले आहे. इथे रोजगार निर्माण झाला. हेल्थ हब म्हणून नागपूर विकसित होत आहे. नागपुरातील रस्ते सुंदर झालेत. कुठल्याही समाजावर अन्याय न करता नागपूरचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रयत्न केला. सबका साथ, सबका प्रयास, सबका विश्वास आणि सबका विकास, हेच आमचे ध्येय आहे, असा निर्धार केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज (सोमवार) व्यक्त केला.

मध्य नागपुरातील गोळीबार चौकात आयोजित विधानसभा निवडणुकीच्या शेवटच्या जाहीर सभेत नितीन गडकरी बोलत होते. मध्य नागपूरचे भाजप-महायुतीचे उमेदवार प्रवीण दटके यांच्या प्रचारार्थ या सभेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी आमदार विकास कुंभारे, मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत आगलावे, माजी महापौर अर्चना डेहनकर आणि दयाशंकर तिवारी, रविशंकर कुंभारे, राजेंद्र रंधनकर, गिरीश देशमुख, सुरेश गोजे, बंडू राऊत, दीपराज पार्डीकर, सुबोध आचार्य, रामभाऊ आंबुलकर, भास्कर पराते, श्रद्धा पाठक आदींची उपस्थिती होती.

नितीन गडकरी म्हणाले, केळीबाग रस्ता मोठा करण्यात अनेक अडचणी आल्या. हा रस्ता पूर्ण व्हायला तेरा वर्षे लागली. पण प्रवीण दटके यांच्या कार्यतत्परतेमुळे या रस्त्याचे काम पूर्ण झाले. राजविलास टॉकीजच्या बाजुला मोठ्या इमारतीचे काम सुरू आहे. शुक्रवारी तलावाचे देखील सौंदर्यीकरण होत आहे. मध्य नागपुरातील अनेक विकासकामे दटकेंच्या प्रयत्नांमुळे आणि पुढाकारातून पूर्ण होत आहेत.

गेल्या दहा वर्षांमध्ये हलबा समाजाचे अनेक प्रश्न सोडवले. पण हे सर्व राजकारणासाठी नव्हे तर समाजासोबत असलेल्या ऋणानुबंधांमुळे केले, असेही नितीन गडकरी म्हणाले. साठ वर्षे ग्रामपंचाय, पंचायत समिती, नगरपालिका, जिल्हा परिषद, महानगरपालिका कांग्रेसकडे होते. पण एवढ्या वर्षांमध्ये नागपूरचा विकास झाला नाही. मात्र आपण दहा वर्षांत नागपूरचा चेहरामोहरा बदलला. नाहीतर सेंट्रल अव्हेन्यू रोडच्या वरून मेट्रो धावू शकते, असा विचारही कुणी केलेला नव्हता, याचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला. नेताजी मार्केट, कॉटन मार्केट, संत्रा मार्केटचा विकास होणार असल्याचेही ना. नितीन गडकरी यांनी सांगितले.

कामठी-कन्हानपर्यंत मेट्रो येणार आहे. गावातील रस्ते चांगले होणार आहेत. या भागात भविष्यात चांगले मार्केट्स उभे होणार आहेत. मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

कामठीतील दलित आणि मुस्लिम समाजाचे जीवनमान उंचावण्याचा आमचा प्रयत्न आहे, असा निर्धार नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. कामठी विधानसभा मतदारसंघाचे भाजप-महायुतीचे उमेदवार चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रचारार्थ नितीन गडकरी यांची सभा आयोजित करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री सुलेखा कुंभारे, आमदार टेकचंद सावरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.




# आचार संहितेचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करा : राम मोहन मिश्रा




* मतदानासाठी निवडणूक विभाग सज्ज
* संवेदनशील भागात ड्रोनद्वारे रात्रीही होणार निगराणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

विधानसभा निवडणुकीसाठी मतदारांना विनासायास मतदान करता यावे, त्यांच्यातही उत्साह वृद्धींगत व्हावा यासह पुरेशा सुरक्षित वातावरणासह अधिक सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी तत्पर राहा. याचबरोबर कुठे जर शांतता भंग करण्याचा अथवा आचारसंहितेचे उल्लंघन करून कोणी जर वातावरण कलुषित करण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्याविरुद्ध तत्काळ कठोर कारवाई करण्याचे निर्देश विशेष निवडणूक निरीक्षक राम मोहन मिश्रा यांनी दिले.


जिल्ह्यात 20 नोव्हेंबर रोजी होणा-या मतदानाच्या पूर्वतयारीबाबत विशेष निवडणूक निरीक्षक राम मोहन मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. मेट्रो भवन येथे आयोजित या बैठकीस पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, निवडणूक निरीक्षक के. वासुकी,नवीन कुमार सिंग, पवन कुमार सिन्हा, अरुण कुमार परमार, संजय कुमार, भोर सिंग यादव, सुनील कुमार, निवडणूक निरीक्षक (पोलिस) अजय कुमार, निवडणूक निरीक्षक (खर्च) देवरंजन मिश्रा, संतोष कुमार मिश्रा, दीपक आनंद, पोलिस अधीक्षक (ग्रामीण) हर्ष पोद्दार, नागपूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे उपस्थित होते.

मतदान केंद्रांवरील पार्किंग व्यवस्थेपासून ते मतदानापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेपर्यंत मतदारांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही याबाबत निवडणूक विभागाने स्थानिक पातळीवर यथाशक्य सुविधा पुरविल्या पाहिजे. निर्भय व निरपेक्ष वातावरणात मतदारांना आपल्या मतदानाचा हक्क बजावता आला पाहिजे. कुठल्याही प्रकारचा अडथळा हा मतदारांना मतदानाच्या दिवशी येऊ नये यासाठी सर्व यंत्रणांनी दक्षता घ्यावी, असे विशेष निवडणूक निरीक्षक राम मोहन मिश्रा यांनी निर्देश दिले.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी यावेळी जिल्ह्यातील निवडणूक यंत्रणेच्या तयारीची सादरीकरणाद्वारे माहिती दिली. जिल्ह्यात एकूण 45 लाख 25 हजार 997 मतदार आहेत. यात पुरुष मतदारांची संख्या 22 लाख 63 हजार 890 आहे. तर महिला मतदारांची संख्या 22 लाख 61 हजार 805 आहे. तर 302 तृतीयपंथी मतदार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच निवडणूक रिंगणात असलेले उमेदवार, मतदान केंद्रांवर पुरविण्यात येणा-या सुविधा, निवडणुकीसाठी उपलब्ध असलेले मनुष्यबळ, कायदा व सुव्यवस्था आदी निवडणूक यंत्रणेच्या तयारी माहिती जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी यावेळी सादरीकरणाद्वारे दिली. जिल्हा निवडणूक यंत्रणेच्या तयारीचे यावेळी विशेष निवडणूक निरीक्षक राम मोहन मिश्रा यांनी कौतुक केले.

मतदान प्रक्रिया शांततेत पार पडावी, कोणताही अनुचित प्रकार होऊ नये यासाठी पोलिस विभागाने घेतलेल्या दक्षतेची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी दिली. संवेदनशील भागात ड्रोनद्वारे लक्ष ठेवण्यात येत असून यात रात्रीही निगराणी होणार असल्याचे त्यांनी सांगितले. कोणत्याही परिस्थितीत कायदा हातात घेणा-यांविरुद्ध पोलिस कठोर कारवाई करेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

## आ.समीर मेघे यांच्या प्रचारार्थ अभिनेत्री भाग्यश्रीची रॅली



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १८ :

हिंगणा विधानसभा क्षेत्रातील भाजपा महायुतीचे उमेदवार आमदार समीर मेघे यांच्या प्रचारार्थ सिनेअभिनेत्री भाग्यश्रीची रॅली वडधामना, सुराबर्डी, खडगाव, द्रुगधामना, लाव्हा आदी भागातुन काढण्यात आली.

रॅलीत परिसरातील नागरिकांनी अलोट गर्दी केली. आमदार समीर मेघे कोणाहीबद्दल भेदभाव करीत नसून संपूर्ण समाजाने एकजूट होऊन सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या पाठीशी उभे रहावे, असे आवाहनही अभिनेत्री भाग्यश्री यांनी केले.

यावेळी वडधामन्याचे सरपंच धिरज आंबटकर, लाव्हाच्या सरपंच ज्योत्सना नितनवरे, द्रुगधामनाच्या सरपंच मंगला रागीट, दवलामेटीचे सरपंच गजानन रामेकर, खडगावचे सरपंच देवराव कडू, सुराबर्डीच्या सरपंच कवीता आंबडकर, वृंदा समीर मेघे, माजी जि.प. सदस्य सुजित नितनवरे, उपसरपंच किशोर सरोदे, नितीन अडसड, संजय कपनिचोर,राजु राव , प्रकाश डवरे, मंगेश खोरगडे, नितीन अन्नपूर्णे, भिमराव मोटघरे, प्रशांत श्रीवास्तव, विनोद चाफेकर आदी सह शेकडो नागरीक उपस्थित होते.

## कष्टाची भाकर! या नाटकाने पाणावले खंडाळा येथील नागरिकांचे डोळे



■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. १७ :

लगच्या खंडाळा येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षी दिवाळीच्या शुभ पर्वावर मंडई निमित्त बालगंधर्व नाट्य रंगभूमी वडसा च्या वतीने सार्वजनिक हनुमान मंदिर खंडाळा येथे नुकताच 13 ऑक्टोंबर 2024 रोज बुधवार ला रात्री 8 वाजता कष्टाची भाकर या तीन अंकी नाटकाचे आयोजन माजी उपसरपंच चक्रधर गभणे याच्या कडून करण्यात आले होते.

या तीन अंकी नाटकाचे उद्घाटक महिला व बाल कल्याण सभापतीअर्वंतिका लेकुरवाडे, यांच्या हस्ते पार पडला. तर प्रमुख उपस्थित म्हणून स्वप्नील श्रावनकर, ग्राम पंचायत सदस्य किरण महांनद,सीमा भाकरे,ज्योती बुलबुले, कृ.उ.बा. समिती संचालक मंगेश तलमले,चंद्रभान किरपान, सेवा सहकारी अध्यक्ष चंद्रशेखर कोंगे,माजी उपसरपंच चक्रधर गभणे,अंकुश भाकरे,उमेश बाग, रामभाऊ कोंगे, आनंदराव बोबडे, राधेश्याम कोंगे, प्रशांत कोंगे, श्रीकांत किरपान, अर्जुन महानंद राकेश वानखेडे,अनिल गभने, तुषार कोंगे, नेमा कोंगे, भुनेश्वर मानकर, मयूर मेश्राम, विक्की भाकरे, प्रणय बोबडे, गणेश कोंगे, उमेश कडूकर, संदीप गेडाम, समीर बाग, अतुल कोंगे, निखिल टेटे, रामा सेलोठे व आदि उपस्थित होते.

बालगंधर्व नाट्य रंगभूमी वाड़साद्वारा नाटक कलावंत प्रशांत झलके, राजू लांजेवार, सुरेश दाने, धनराज शेलोकर, सुहास राऊत, शुभम भैसरे यांच्या तेजस्वी लेखणीतून साकारलेली लावणीप्रधान नाट्य विध्वंश संसाराचा या नाटकाचे आयोजन करण्यात आले होते, या नाटकात कलाकार म्हणून करण लुटे सुभाष वैद्य आणि सिने कलाकार म्हणून निशा ब्रह्मांकर महेश्वरी पटले जयश्री खुणे ह्या होत्या. नाटक पाहण्यासाठी नागरिकांची हनुमान मंदिराच्या पटांगणात येथे एकच गर्दी दिसून येत होती. या नाटकातील कलाकार सर्व वळसा येथील असल्याने नाटक पाहणारे सर्व नागरिक भारावून गेले होते. मंडई निमित्य गावत जणू काही पाहुण्यांची जत्रा भरत असते.



# बेला येथे रूट मार्च

■ महासागर प्रतिनिधी
बेला दि. १८ :

बेला पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या उमरेड व हिंगणा विधानसभा क्षेत्रात निवडणुका शांततेत सुव्यवस्थित पार पाडाव्यात या उद्देशाने गावामध्ये पोलिसामार्फत रूट मार्च काढण्यात आला होता.

बेला पोलीस स्टेशन अंतर्गत 64 गावे येत असून हिंगणा मतदारसंघाचा काही भाग तर उमरेड विधानसभा क्षेत्राचा काही भाग येतो शिवाय इतर जिल्हा हिंगणघाट विधानसभा क्षेत्र चिमूर विधानसभा क्षेत्रची सीमा लागत असल्याने येथील पोलीस विभाग नेहमी सतर्क असतो.

ठाणेदार सी.बी. चव्हाण यांनी प्रत्येक ग्रामपंचायतला मुनादिद्वारे मतदान जागृत ध्वनिफीत गावामध्ये फिरविण्यास सांगितली असून मतदान जनजागृती होत आहे. या दोन्हीही विधानसभा क्षेत्राची सुरक्षेच्या दृष्टीने अतिरिक्त 54 गृह विभागाचा स्टॉप चे ठाणेदार सी.बी. चव्हाण उपनिरीक्षक खंडेराव बोडगीर यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार दारासिंग राठोड पोलीस अंमलदार अमोल काळे, प्रवीण नैनवार, सोनू चटप आदी चमू सुरक्षाची व्यवस्था पार पडत आहे.

## न्यू इंग्लिश ज्युनिअर कॉलेजमधील २९ वर्षानंतर वर्गमित्रांचे जुळले ऋणानुबंध




■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १८ :

न्यू इंग्लिश ज्युनिअर कॉलेज मधील १९९४-१९९५ च्या बॅचमधील वर्गमित्रांचे तब्बल २९ वर्षानंतर ऋणानुबंध स्नेहमिलन सोहळा उत्साहात पार पडला.

यावेळी माजी विद्यार्थ्यांच्या बॅच तर्फे उपस्थित गुरुजनांचा यथोचित शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. शिक्षादान कार्याकरिता सन्मानचिन्ह भेट म्हणून देण्यात आले. स्वागत सोहळ्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याने आपापली ओळख करून दिली व मनोगत व्यक्त केले.

मनोगतात शाळेतील आपापले अनुभव कथन केले. तसेच शिक्षकांविषयीच्याही आठवणी सांगितल्या. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले. आयोजनासाठी रविंद्र निमजे, निलेश भरडभूंजे, मुकेश बोरीकर, कविता निमजे, दर्शना गडीकर यांनी सहकार्य केले.

यावेळी गणेश पौनिकर, संजय जिवनकर, ज्ञानेश्वर मौंदेकर, चंद्रकांत घुले, प्रशांत भेंडे, मुकेश नंदनवार, निलेश बालपांडे, शुभांगी वाघमारे, योगिता पाठराबे, अनिता चिंचघरे आदी असे ४० वर्ग मित्र मैत्रिणी उपस्थित होते.

# सकल सोनार महासंघातर्फे बैठकीचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

तात्या टोपे नगर, जोग हाऊस, नागपूर, येथे "सकल सोनार महासंघ" तर्फे बैठकीचे आयोजन करण्यात आले.

सभेत सोनार समाजाच्या ज्वलंत मागण्यांबाबत बैठकीचे अध्यक्ष संजय भेंडे, भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश व रमेश शिंगारे उपाध्यक्ष, भा.ज.पा. नागपूर, यांना अवगत करण्यात आले.



त्यांनी वरिष्ठाच्या परवानगीने मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन उपस्थित समाज बांधवांना दिले. बैठकीला समाज कार्यकर्ते सर्वश्री मुकुंदराव शहाणे, बाळासाहेब बाळापूरे, राहूल बाळापूरे, प्रमोदराव तिनखेडे, विजय थुगांवकर, सुनिल पाचकवडे, राजेंद्र बांगरे, नरेंद्र बांगरे, शरद मादुरकर, पियुष सागोळकर, अमीश मस्के, ॲड. सतीश निनावे, सतीश घोडे, महेंद्र बांगरे रीता बाळापूरे, गौतमी येरपूडे, सुष्मा निनावे, सिमंतीनी अडाणे, माधुरी येरपूडे, अर्चना निवडींग, हर्षेल पालकर, डॉ. देविका बैतुले, सिमा इनकाने, मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. बैठकीचे आयोजक शंतनु येरपूडे भा.ज.पा. चे कार्यकर्ते यांनी आभार प्रदर्शन करुन बैठकीचा समारोप केला.

समाज बांधवांनी भारतीय जनता पार्टी दक्षिण-पश्चिम विधानसभा क्षेत्रातील भाजपाचे उमेदवार देवेंद्र फडणविस यांना महासंघाचा पूर्ण पाठींबा असल्याचे जाहीर केले.

## द्रुगधामना हायस्कूलमध्ये मतदान जनजागृती

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. १८ :

द्रुगधामना हायस्कूल व आदर्श कला वाणिज्य, एच.एस.सी. व्होकेशनल यांच्या सयुंक्त सहकार्याने प्राचार्य ज्योती अढाऊ यांच्या अध्यक्षतेखाली मतदान जनजागृती कार्यक्रम शनिवार १६ नोव्हेंबर रोजी पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांना मतदान करण्याची शपथ देण्यात आली. यावेळी प्रा. अविनाश चौधरी, प्रा.बाबूलाल मोरे, प्रा.नंदकिशोर भोयर, प्रा. अविनाश बारब्दे, प्रा. गजानन काकड, प्रा. प्रगती पाचपोहर, प्रा. जयश्री किरणापूरे, आरती भोरे, वंदना मुसळे, विलास मुसळे, लक्ष्मण शिंदे, राजू शेळके, शंकर राऊत , पंढरी धार्मीक प्रामुख्याने उपस्थित होते.

# बारबटपूर रेल्वे स्थानकावर "स्टेशन महोत्सव" साजरा




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने १२ नोव्हेंबर २०२४ रोजी बारबटपूर रेल्वे स्थानकावर "स्टेशन महोत्सव" यशस्वीरित्या आयोजित केला. भारतीय रेल्वेच्या वारशाचा गौरव करण्यासाठी आणि त्याच्या समाजातील योगदान तसेच ऐतिहासिक महत्त्वाबद्दल जनजागृती निर्माण करण्यासाठी आयोजित केलेला हा अनोखा कार्यक्रम होता. या कार्यक्रमात गावकरी, रेल्वे कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबांनी उत्साहीपणे सहभाग घेतला, ज्यामुळे हा कार्यक्रम एक रंगीबेरंगी समुदाय मेळावा बनला.

कार्यक्रमाची सुरुवात सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे झाली, ज्यात स्थानिक कला रूपांचा दाखला देण्यात आला. यानंतर ऐतिहासिक प्रदर्शन आयोजित केले गेले, ज्यामध्ये जुने रेल्वे छायाचित्रे, कलाकृती आणि आठवणींचा संग्रह ठेवण्यात आला. या प्रदर्शनाने युवा पिढीत रेल्वेच्या इतिहासातील रुची वाढवली.

कार्यक्रमात स्थानक प्रमुख आणि वरिष्ठ स्थानक कर्मचाऱ्यांनी उपस्थितांना संबोधित करताना रेल्वे वारशाच्या जतनाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचा समारोप रेल्वे कर्मचाऱ्यांच्या समुदायासाठी केलेल्या योगदानाचे कौतुक करण्यासाठी एका सन्मान समारंभाने झाला.

"स्टेशन महोत्सव" हा केंद्रीय रेल्वेच्या समुदायाशी संपर्क साधण्याच्या आणि भारताच्या रेल्वे वारशाबद्दल एकता आणि आदराच्या मूल्यांचे प्रोत्साहन देण्याच्या कटिबद्धतेचे प्रतीक आहे.

## रातुम विद्यापीठ भारत्तोलन पुरुष संघाची घोषणा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या भारत्तोलन (वेटलिफ्टिंग) संघाची घोषणा क्रीडा व शारिरिक शिक्षण विभाग प्रभारी संचालक डॉ.विशाखा जोशी यांनी केली. आचार्य नागार्जून विद्यापीठ गुंटूर येथे 30 नोव्हेंबर ते 3 डिसेंबरदरम्यान दक्षिण-पश्चिम क्षेत्रिय आंतरविद्यापीठ स्पर्धेत विद्यापीठाचा संघ सहभागी होणार आहे.

यात नॅशनल फायर कॉलेज, नागपूरचे नरेश कुमार (67 कि.वजनगट) साकेत शारीरिक शिक्षण महा. गोंदियाचे देवेंद्र गुजर (73 कि.वजनगट), अग्निहोत्री अभियांत्रिकी महा, वधार्चे यश बोरकर (81 कि,वजनगट), अनुप भोगले (109 कि,वजनगट), यशवंत महा. वधार्चे तेजस सावळे (109 कि.वजनगट) यांचा भारत्तोलन संघात समावेश आहे.

# समर्थ हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मतदान जनजागृती कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक दि. १८ :

महाराष्ट्रात मतदानाची टक्केवारी तशी नेहमीच कमी असते शहरी भागात तर मतदान कमीच होत असते मतदारांनी आपल्या हक्काबाबत जागृत राहून मतदान केले पाहिजे मतदानाची टक्केवारी वाढली तरच योग्य आणि जबाबदार प्रतिनिधी मिळू शकेल.

विकास सर्वांनाच हवा असतो परंतु तो टिकाऊ आणि सुविधा जनक असावा, यासाठी पंचायत समिती रामटेक व समर्थ हायस्कूल व तथा कनिष्ठ महाविद्यालय रामटेक यांचा संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी नागपूर यांच्या प्राप्त निदेर्शानुसार या कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती मोहीम उपक्रमांतर्गत दिनांक १८ नोव्हेंबर ला समर्थ हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय रामटेक येथील मतदान स्वयंसेवक विद्यार्थी तथा इतर विद्यार्थ्यांची रामटेक शहरातून रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.




मतदान जनजागृती रॅलीमध्ये गट विकास अधिकारी प्रफुल्ल लोखंडे,पंचायत समिती रामटेक, सहाय्यक गट विकास अधिकारी मारुती भुजाडे, गटशिक्षणाधिकारी विजय भाकरे, शिक्षण विस्तार अधिकारी शालिनी रामटेके, महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका तथाप्राचार्य एम एन लोखंडे मॅडम, महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्राध्यापक आर व्ही गायकवाड यांची आवर्जून उपस्थिती होती.

तसेच दि.१६ नोव्हेंबर ला समर्थ हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय रामटेक येथे पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित पालकांना शिक्षकांनी मतदानाचे अधिकार व महत्त्व यावर सविस्तर मार्गदर्शन केले व पालकांसमवेत मतदान करण्याची शपथ घेतली.

# अ‍ॅग्रोव्हिजन राष्ट्रीय कृषी प्रदर्शन व परिसंवाद कार्यशाळेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

विदभार्तील शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञानाची, जोडधंद्यांची माहिती व्हावी त्याचा उपयोग त्यांच्या उत्पन्न वाढीसाठी व्हावा आणि त्यांची शेती लाभदायक व्हावी या हेतूने, केंद्रिय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारलेले अग्रोव्हिजन कृषी प्रदर्शन येत्या २२ नोव्हेंबर पासून पीडीकेव्ही, दाभा मैदानावर सुरू होत आहे. राष्ट्रीय कृषी प्रदर्शन, शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा, एकदिवसीय परिषदा असे स्वरूप असणाऱ्या अग्रोव्हिजनची तयारी आता अंतिम टप्प्यात आली आहे. २२ नोव्हेंबर रोजी सकाळी 10.30 वाजता मध्य प्रदेशचे मुख्य मंत्री मोहन यादव यांच्या हस्ते, अ‍ॅग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

या प्रदर्शनासाठी, अंदाजे 11,000 चौरस मीटरचे हॅंगर्स आणि 6,000 चौरस मीटरचे खुल्या मैदानातील स्टॉल उभारले आहेत, यात कार्यशाळेचे 3 हॉल व विशेष कार्यशाळेसाठी 1 हॉल असेल. मागील अग्रोव्हिजनला शेतकरी आणि कृषी-संबंधित लोकांचा जबरदस्त प्रतिसाद लाभला. यावर्षी 15 व्या अग्रोव्हिजनसाठी असाच उत्साह अपेक्षित आहे, 400 हून अधिक कंपन्यांनी सहभाग निश्चित केला आहे, असे अग्रोव्हिजनचे आयोजन सचिव रवी बोरटकर यांनी सांगितले. भारतातील कृषी उत्पादनांचे उत्पादन करणाऱ्या अनेक नामवंत कंपन्या, संशोधन संस्था, सरकारी विभाग, विविध राज्ये आणि कृषी विद्यापीठे या प्रदर्शनात त्यांचे तंत्रज्ञान सादर करतील. याशिवाय देशातील प्रगत कृषी तंत्रज्ञान, संशोधन आणि सेवा क्षेत्रातील आघाडीच्या संस्थाही यात सहभागी होणार आहेत.

यावर्षी, युपीयल ही अग्रोव्हिजनचे मुख्य प्रायोजक आहे, ट्रॉफी कुबट, महेंद्र ट्रॅक्टर , सोनालिका ट्रॅक्टर, जॉन डिअर ट्रॅक्टर , तिर्थ अग्रो या सारख्या ट्रॅक्टर कंपन्या, अंकुर सीड्स, अजित सीड्स, महाबीज, रासी सीड्स, महिको, निझूवेडु सीड्स सारख्या बियाणे कंपन्या तसेच बीकेटी टायर्स, जेके टायर्स या सारख्या टायर कंपन्या आयटीसी, धानुका, क्रिस्टल क्रॉप केअर, सल्फर मिल्स, पारिजात इंडस्ट्रीज, पी आय इंडस्ट्रीज या सारख्या क्रॉप इनपुट्स च्या कंपन्या गरुडा, थानोस, आर फ्लाय इनोव्हेशन, रुचा यंत्र, आयोटेक वर्ल्ड या सारख्या ड्रोन कंपन्या, प्लास्टो, जैन इरिगेशन; पारस ग्रुप, नेटाफिम, रावूलिस या सारख्या इरिगेशन च्या कंपन्या, तसेच सौर क्षेत्रातील कंपन्या,नाबार्ड, एसबीआय, कॅनरा, पंजाब नॅशनल बँक, सीडबी, एनसीबीएक्स यासारख्या बँकिंग क्षेत्रातील कंपन्या, आयसीएआर, एनबीएसएसएल यूपी सारख्या संशोधन संस्था, आयआयटी खरगपूर, व्हीयनआटी नागपूर, पीडी केव्ही अकोला आणि एमएएफएसयु सारख्या शैक्षणिक संस्था देखील आहे. मागील वर्षांप्रमाणेच, या वर्षीच्या अग्रोव्हिजनमध्ये एमएसएमईसाठी व स्टार्टअप साठी खास पॅव्हेलियन देखील असेल.




यावर्षी अग्रोव्हिजनमध्ये एकूण 41 विविध विषयांवर कार्यशाळा आयोजित केल्या जातील. या कार्यशाळांमध्ये शेतकऱ्यांना देशभरातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि यशस्वी शेतकऱ्यांकडून शिकण्याची अनोखी संधी मिळेल. शेतकऱ्यांसाठी उपयुक्त अनेक विषयांचा समावेश यावर्षी कार्यशाळांमध्ये करण्यात आला आहे. यात कृषी क्षेत्रात ड्रोनचा वापर, फुलशेती, भाजीपाला बियाण्यांचे उत्पादन, हळद आणि आलं लागवड व प्रक्रिया, बांबू लागवड, औषधी वनस्पती लागवड तंत्रज्ञान, कृषी रसायनांचा योग्य वापर, तेलबिया उत्पादन, रेशीम शेती, शेळी-मेंढी पालन, मधमाशी पालन, नैसर्गिक शेती, विदभार्तील अग्रोटुरिझमच्या संधी, कुक्कुटपालन यांसारख्या महत्त्वाच्या विषयांचा समावेश आहे.

या वर्षी अग्रोव्हिजनमध्ये २२ नोव्हेंबर रोजी यावर्षी विदभार्तील दुग्धव्यवसाय वाढीच्या संधींवर एक दिवसीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद एनडीडीबीच्या सहकार्याने आयोजित करण्यात येणार आहे. याशिवाय अग्रोव्हिजनमध्ये काही विशेष कार्यशाळा देखील आयोजित केल्या आहेत. त्यामध्ये उसाच्या लागवडीसाठी तंत्रज्ञानावर कार्यशाळा २३ नोव्हेंबर रोजी सकाळी 11 वाजता आणि कृषी क्षेत्रात तरुणांचा सहभाग यावर कार्यशाळा दुपारी 2 वाजता होणार आहे. 24 नोव्हेंबर रोजी सकाळी 11 वा. विदभार्तील अन्न प्रक्रिया संधी आणि दुपारी 2 वा. शेतकरी उत्पादक संघटनांवर कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. तसेच, 25 नोव्हेंबर रोजी सकाळी 11 वाजता संत्रा उत्पादन वाढीसाठी तंत्रज्ञान आणि दुपारी 1:30 वाजता विदभार्तील मत्स्य व्यवसायावर कार्यशाळा होणार आहे. अशी माहिती अग्रोव्हिजनच्या पत्रकार परिषदेत देण्यात आली.

पत्रकार परिषदेत अग्रोव्हिजन सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. सी.डी. मायी, आयोजन सचिव रवी बोरटकर, रमेश मानकर, यांच्यासह अग्रोव्हिजन फाउंडेशन चे सदस्य श्री शिरीष भगत, सुधीर दिवे, आनंदराव राउत, कलंत्री, साहतपुरे, देवेंद्र पारेख, रामबाबू कदम, नवीन मालेवार, इलोरकर, डॉ. खवले व हितेंद्र सिंग यांची प्रमुख उपस्थिती होती.शेतकरी, उत्पादक, ग्राहक, कृषी विद्यार्थी आणि कृषीप्रेमी अशा प्रत्येकाने या प्रदर्शनाला नक्की भेट द्यावी तसेच शेतकऱ्यांनी कार्यशाळा व परिषदांचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले.

## बी अँड टर्टल प्ले स्कूल येथे चित्रकला प्रतियोगिता

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

भोले नगर येथील द बी एंड टर्टल प्ले स्कूल आयोजित रंगोत्सव २०२४ ने कला आणि शिक्षणाला एकत्र जोडत दोन महत्त्वपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन केले होते. पहिला कार्यक्रम चित्रकला स्पर्धा होती, ज्याची टॅगलाइन होती, जिथे रंगात आहे गोष्ट आणि चित्रांमध्ये आहे भविष्य. ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी त्यांच्या रचनात्मकतेची आणि कल्पकतेची छान मांडणी केली होती.दुसरा कार्यक्रम EECED शिक्षकांसाठी डिप्लोमा समारंभ होता, जो लिटिल एंजल्स टीचर ट्रेनिंग इंस्टीट्यूटच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात प्राथमिक बालशिक्षणात डिप्लोमा प्राप्त केलेल्या शिक्षकांना सन्मानित करण्यात आले. अदिती राजेश चकोले भूमिका शुभम पांडे, दिपाली श्रीकांत शिंगणे,कल्याणी व्यंकटेश धनजोडे, दिनेश सहारे, मृणाल देडमुठे, मृण्मयी गुहे, भावना राहुल वानखेडे या विद्यार्थ्यांना त्यांना डिप्लोमा प्रदान करण्यात आला होता.

# माकणी गावात बांधले वनराई बंधारे




■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १८ :

हंगामातील पिकांना संरक्षित ओलिताची सोय व्हावी, यासाठी मौजा माथनी तालुका हिंगणा,येथे मंडळ कृषी अधिकारी कार्यालय कान्होलिबारा, यांच्या माध्यमातून मोहन भांडेकर व राजू गिरी यांच्या शेताजवळ लोक सहभागासोबत मंडळ कृषी अधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांच्या सहभागातून वनराई बंधारा बांधण्यात आला. त्याकरिता शेतकरी बांधवांसोबत मंडळ कृषी अधिकारी संजय काळसर्पे, कृषी पर्यवेक्षक ममता महाजन, कृषि सहाय्यक गोपाल इडोळे, सुभाष बावनकर, विद्या वाघ, प्रेरणा जाधव, सविता कटकतलवारे पिक विमा प्रतिनिधी तुषार रेवतकर कृस यांनी उपस्थित राहून श्रमदान केले.

## राज्य युवा बास्केटबॉल स्पर्धेत नागपूरच्या मुली उपविजेत्या

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ : :

शिवाजीनगर जिमखानार्ते आयोजित शिवाजीनगरच्या बॉस्केटबॉल मैदानावर नुकत्याच पार पडलेल्या बास्केटबॉल स्पर्धेत पुणे संघासोबत संघर्ष करीत नागपूर संघाने उपविजेतेपद पटकावले. नागपूरच्या संघात ऋद्धी बोरकर, आर्या डगवार, ऋषिका धवल, नंदिनी शर्मा, कनिष्का मांडे, खुशी चोरे, वंशिका अग्रवाल, वेदांतिका गोरले, वेदिका मोहता, ज्ञानदा शैरे, अहिल्या बडखळ, आखर मिश्रा यांचा समावेश होता.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त तसेच महाबास्केटबॉल संघटनेचे सचिव शत्रुघ्न गोखले यांच्या नेतृत्वात नितीन पटवर्धन, आदित्य छाजेड, आयुष अग्रवाल, विनय चिकाटे, सिद्धेश कुळकर्णी, सचिन घाडगे, मेघा निमजे, काकडे, साक्षी शेंडे, अनुष्काभ लमे, आदित्य कुलमाथे, पुरुषोत्तम राऊत, मोहीत रहाटे, लकी दूधमोगरे, शशांक घाडगे, वितोंडे आदिंनी मोलाचे सहकार्य केले.

# लाडक्या बहिणींना आगावू रक्कम... पेन्शनरांची रक्कम दोन वर्षांपासून थकीत

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १८ :

नागपूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातून सेवानिवृत्त झालेल्या जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षक व केंद्रप्रमुखांच्या हक्काचे आर्थिक लाभ विहित मुदतीत मिळत नसल्याने मागील दोन वर्षांपासून सेवानिवृत्ती पश्चात मिळणारे उपदान व अंशराशीकरणाची (पेन्शन विक्री) कोटीची रक्कम थकीत असल्याची माहिती महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक शिक्षकेतर सेनेचे राज्य सरचिटणीस शरद भांडारकर यांनी दिली.

एकीकडे राज्य सरकार लाडक्या बहिणींना निवडणुकीच्या तोंडावर आगावू रक्कम त्यांचे बँक खात्यावर जमा करीत असताना जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये प्रदीर्घ काळ सेवा करून निवृत्त झालेल्या प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुखांबाबत इतकी अनास्था का? असा प्रश्न आता विचारला जात आहे.

सेवानिवृत्ती नंतर उपदान, अंशराशीकरण व गट विमा योजनेची अनुज्ञेय रक्कम किमान दोन महिन्यात अदा करणे गरजेचे असताना जिल्हा परिषद प्रशासनाच्या दफ्तर दिरंगाईमुळे जुलै २०२२ ते सप्टेंबर २०२४ या काळात निवृत्त झालेल्या जवळपास ४०० सेवानिवृत्त शिक्षक व केंद्रप्रमुखांना लाखो रुपयांची रक्कम गेल्या दोन वर्षांपासून मिळालेली नाही.

जिल्हा परिषद प्रशासनाने सेवानिवृत्त शिक्षक व केंद्रप्रमुखांच्या थकीत आर्थिक लाभ किमान दसादशे ८.२० टक्के चक्रवाढ व्याजासह द्यावेत, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक शिक्षकेतर सेने तर्फे देविदास काळने, मनोज घोडके, जनार्दन सवाई, सुधीर सोनटक्के, श्यामराव डोये, नंदकिशोर उजवणे, दिनकर वानोडे, पुरुषोत्तम चिमोटे, हरिश्चंद्र दहाघाने, युवराज उमरेडकर, प्रकाश कोल्हे, वामन सोमकुवर, विजय बरडे, संतोष बुधबावरे, प्रवीण मेश्राम, भास्कर क्षीरसागर, सुभाष घवघवे, श्रीराम वाघे, रमेश बिरणवर, वनमाला डोकरीमारे, अलका जिचकार आदींनी केली आहे.

# त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त 'एक दीप हिंदु राष्ट्रासाठी'!

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :

त्रिपुरारी पौर्णिमा हिंदूंसाठी एक महत्वाचा उत्सव आहे. या शुभ मुहूर्तावर मंदिरात आणि घरांमध्ये दिवे लावून हिंदू बांधवांनी यावर्षीही दीपोत्सव साजरा केला. या निमित्ताने देशभरात ठिकठिकाणी मंदिरांमध्ये स्थित त्रिपुर (दीपमाळ) प्रज्वलित केले गेले. यंदाच्या दीपोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे हिंदु राष्ट्राचा संकल्प करण्यासाठी 'एक दीप हिंदु राष्ट्रासाठी' हा उपक्रम हिंदु जनजागृती समितीच्या वतीने देशभरात राबवून जनजागृती करण्यात आली. महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, दिल्ली, उत्तर प्रदेश, झारखंड, पश्चिम बंगालसह अन्य राज्यांत हा उपक्रम संपन्न झाला. या वेळी विविध हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या प्रतिनिधींसह धर्मप्रेमी आणि भाविकांनी यात सहभाग घेतला.

कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी श्री शंकराने त्रिपुरासुराचा नाश केला, त्या प्रित्यर्थ त्रिपुरारी पौर्णिमेचा उत्सव साजरा केला जातो. आसुरी शक्तीवर चांगल्या शक्तीचा विजय म्हणून तो भारतातील बऱ्याच ठिकाणी मंदिरांतून साजरा केला जातो. सध्या समाजात असलेल्या अनिष्ट प्रवृत्ती नष्ट करून लोककल्याणकारी हिंदू राष्ट्र यावे या उदात्त हेतूने 'एक दीप हिंदु राष्ट्रासाठी' या उपक्रमातून समाजामध्ये जनजागृती करण्यात आली. या उपक्रमात सहभागी झालेल्या हिंदू धर्मप्रेमींनी मंदिरे, घरी आदी ठिकाणी दीप प्रज्वलित करताना 'एक दीप हिंदु राष्ट्रासाठी' याविषयीचे फलक हातात धरून लोकांचे प्रबोधन केले. नागपुरातील धर्मप्रेमी आणि हिंदुत्वनिष्ठ यांनी हातात प्रबोधन फलक घेऊन, घरी दीप लावून तसेच घरी रांगोळीच्या माध्यमातून 'एक दीप हिंदु राष्ट्रासाठी' हा संदेश दिला.

# आदिवासी नृत्य महोत्सवाचा समारोप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर, सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 15 ते 17 नोव्हेंबर 2024 या कालावधीत भगवान बिरसा मुंडा यांची 150 वी जयंती आणि आदिवासी गौरव दिनानिमित्त साऊथ सेंट्रल झोन कल्चरल सेंटर, नागपूर कॅम्पसमध्ये दररोज संध्याकाळी ६ वाजता आदिवासी नृत्य महोत्सव आयोजित करण्यात आला होता.



या महोत्सवाचे उद्घाटन 15 नोव्हेंबर 2024 रोजी बेगा पारधोनी नृत्य समूहाचे प्रमुख पद्मश्री अर्जुनसिंह धुर्वे, आदिवासी विकास विभागाचे अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे आणि समाज कल्याण विभागाचे माजी सहआयुक्त आत्राम यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

17 नोव्हेंबर 2024 रोजी या महोत्सवाची रंगतदारपणे सांगता झाली. याप्रसंगी संदीप शेंडे, सहाय्यक संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई, दीपक कुलकर्णी, सहाय्यक संचालक (कार्यक्रम) दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर उपस्थित होते. आभार श्री दीपक कुलकर्णी, सहायक संचालक (कार्यक्रम), दक्षिण मध्य विभागीय सांस्कृतिक केंद्र, नागपूर यांनी व्यक्त केले. या तीन दिवसीय महोत्सवात ढोलू कुनीथा नृत्य (मलिंगराय बरगली व गट, कर्नाटक), तारपा नृत्य (अमोल जाधव व गट , महाराष्ट्र), काकसार नृत्य, गेडी नृत्य (दयाराम उईके व समूह, छत्तीसगड ), गोंडी नृत्य (स्थानिक) समूह), कोमू कोया नृत्य (नागिरेड्डी इंद्रसेनरेड्डी आणि समूह, आंध्र प्रदेश), बैगा परधोनी नृत्य (पद्मश्री अर्जुन) सिंग धुर्वे आणि गट, मध्य प्रदेश), गुसाडी नृत्य (किरीट कुमार आणि समूह, तेलंगणा) या नृत्यांचे आकर्षक सादरीकरण करण्यात आले. या तीन दिवसीय महोत्सवाचे सूत्रसंचालन वैदेही चवरे यांनी केले. दक्षिण मध्य विभागीय सांस्कृतिक केंद्र, नागपूरचे प्रशासकीय अधिकारी दीपक पाटील, सहाय्यक गणपतलाल प्रजापती, राजेश खडसे. 6 राज्ये 100 पेक्षा जास्त उत्सवादरम्यान दररोज आदिवासी कलाकार आणि स्थानिक आदिवासी कलाकारांच्या गटांद्वारे विविध नृत्यांचे रंगीत सादरीकरण दिले. सर्व सादरीकरणांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. महोत्सवात दररोज प्रेक्षकांची मोठी उपस्थिती होती.

## राष्ट्रीय कॅन्सर जागरूकता दिवस साजरा

**नागपूर :** दरवर्षी 7 नोव्हेंबरला साजरा करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय कॅन्सर जागृकता दिवसाची यावर्षीची थीम ही होप, लव्ह अँड स्ट्रेंथ अवर वेपन्स अगेन्स्ट कॅन्सर अशी होती व यालाच अनुसरून इंटास फाउंडेशन अपना घर नागपूर येथील कॅन्सर रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी कॅन्सर विरुद्ध शारीरिक व मानसिक शक्तींना उंचावून लढा देऊ व कॅन्सर विरुद्ध जनजागृती करू अशी शपथ घेऊन राष्ट्रीय कॅन्सर जागृ कता दिवस साजरा केला.

हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश म्हणजे लोकांमध्ये कर्करोगाबद्दल जागरूकता निर्माण करणे सोबतच जे कॅन्सर पीडित आहेत त्यांची हिंमत व आत्मविश्वास वाढविणे, कॅन्सर सारख्या गंभीर आजाराबद्दल भीती कमी करणे व रुग्णांची वेळेवर तपासणी करून योग्य उपचाराविषयी मार्गदर्शन करणे हे होय. समुपदेशक प्रवीना गेडाम आणि संस्थेचे प्रकल्प सहाय्यक निखिल वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# लोकांना घरे विकावी लागत आहेत

## पंतप्रधान गृहनिर्माण निधी वेळेवर न मिळाल्याने वाढल्या अडचणी

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १८ :

गरिबांना राहण्यासाठी हक्काचे घर मिळावे, यासाठी केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री आवास घरकुल योजना राबविण्यात येत असून राज्य शासनामार्फत शब्बरी व रमाई आवास योजना राबविण्यात येत आहेत. याअंतर्गत ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना 1 लाख 20 हजार तर शहरी भागातील 2.50 लाख रुपयांचे अनुदान दिले जाते. ग्रामीण भागात विटा, रेती, सिमेंट स्वस्त पडेल, असा विचार करून ग्रामीण आणि शहरी विभागातील रकमेत मोठी तफावत आहे. आजच्या महागाईच्या काळात ग्रामीण भागात एवढ्या कमी पैशात घर बांधणे फार कठीण झाले आहे. जिल्हा विकास ग्रामीण यंत्रणेमार्फत घरकुल योजना राबविण्यात येत आहे.

प्रधानमंत्री आवास योजना, शबरी आवास योजना, रमाई आवास योजना, या योजनांसाठी पात्र लाभार्थ्यांना शासनाकडून देण्यात येणारे अनुदान, घरे बांधण्यासाठी सिमेंट, बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या विटा, ग्रामीण व शहरी लाभार्थ्यांमध्ये असा भेदभाव का, असा प्रश्न विचारत वेळचे माजी सरपंच सचिन इंगळे व सचिव सचिन खोडे यांनी शासनाकडून समान निधी मिळावा यासाठी अनेक प्रयत्न केले, मात्र आजतागायत यश मिळालेले नाही. या संदर्भात त्यांनी पंतप्रधानांचे लक्ष वेधले असून शहरी आणि ग्रामीण भागात घरे बांधण्यासाठी देण्यात येणाऱ्या रकमेतील भेदभाव दूर करून समान रक्कम देण्यात यावी, अशी मागणी केली आहे. सरकारने आधीच केल्याचे सांगण्यात आले.

रक्कम देण्याची योजना आहे, मात्र त्यानंतरही रक्कम वेळेवर न मिळाल्याने त्या अपूर्ण घराचे बांधकाम बाहेरून कर्ज घेऊन करावे लागत आहे. मात्र शासनाकडून वेळेवर पैसे मिळत नसल्याने त्यांना कजार्ची वेळेवर परतफेड करता येत नसल्याने व्याजामुळे कजार्चा बोजा वाढत असून लाभार्थ्यांना आता घर विकावे लागत आहे. अनेक लाभार्थींना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे.

सरकारने अद्याप ७५ टक्के रक्कम दिलेली नाही, असे सांगण्यात आले की, ग्रामीण आणि शहरी भागात निधीमध्ये मोठी तफावत आहे. सरकारने अद्याप ७५ टक्के रक्कम दिलेली नाही. गेल्या पाच वर्षांत बांधकाम साहित्याच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत.

मजुरीही वाढली आहे. एवढ्या कमी पैशात घर बांधणे अवघड आहे. ग्रामीण भागात बांधकामाचे प्रमाण खूपच कमी आहे. लोखंड, वाळू आणि मजुरांचे दर आवाक्याबाहेर, प्रधानमंत्री आवास योजनेतील गावे घर बांधण्यासाठी 1 लाख 20 हजार रुपये अनुदान मिळते. अनुदानही चार टप्प्यात दिले जाते. नगरपरिषद क्षेत्रातील पात्र लाभार्थ्यांना प्रति कुटुंब 2.50 लाख रुपये अनुदान मिळते. मग साहित्याच्या किमती सर्वत्र सारख्याच असतात. ग्रामीण भागात अनुदान जास्त असावे, बांधकाम मजुरी गगनाला भिडत आहेत, बांधकाम साहित्याच्या किमती गगनाला भिडल्या आहेत, अशी लाभार्थ्यांची मागणी आहे.

शासनाने लाभार्थ्यांना २५ टक्के निधी देऊन त्यांच्या समस्यांचे समाधान केले. परंतु अद्याप ७५ टक्के निधी त्या लाभार्थ्यांना देण्यात आलेला नाही. संबंधित विभागात जाऊन चौकशी केली असता, राज्य सरकारकडून निधी आला होता, तो देण्यात आल्याचे अधिकारी सांगतात. केंद्राचा निधी अद्याप आलेला नाही. ते कधी येणार याबाबत माहिती नाही. सन 2018-19 मध्ये घरकुलाचे बांधकाम पूर्ण होऊनही शासनाकडून अद्याप निधी उपलब्ध झालेला नाही.

कर्ज घेऊन घरे बांधल्याने कजार्चा बोजा वाढल्याचे लाभार्थी सांगतात. कर्ज भरावे लागत असल्याने त्यांच्याकडे घर विकण्याशिवाय पर्याय नाही. अशा परिस्थितीत सरकार लाभार्थ्यांना त्यांच्या कुटुंबासाठी पैसे देते की त्यांचे कुटुंब विकून त्यांना बेघर होण्याची शक्यता पाहत राहते, अशी चर्चा आता त्या लाभार्थ्यांमध्ये सुरू आहे.

प्रशासनाकडून घरकुल योजनेंतर्गत ग्रामीण व शहरी भागाला देण्यात येणाऱ्या रकमेत मोठी तफावत आहे. शासनाने शहरी व ग्रामीण भागात घरगुती निधी वाढवावा, अशी नागरिकांची मागणी आहे.

लोकांना समान न्याय द्या. महागाईमुळे आर्थिक विवंचनेमुळे घर विकले दुसरा पर्याय नाही. बांधकाम करताना इकडून तिकडून पैसे आणले जात होते. कसे तरी पोट कापून घर बांधले. मात्र सरकारने अद्याप 75 टक्के रक्कम भरलेली नाही.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ८६ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 51 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. सोमवार (18) रोजी शोध पथकाने 86 प्रकरणांची नोंद करून 45,700/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 24 प्रकरणांची नोंद करून 9,600/- रुपयांची वसुली करण्यात आली.

व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे (रु. 100/- दंड) या अंतर्गत 4 प्रकरणांची नोंद करून 400/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 8 प्रकरणांची नोंद करून 3,200/- रुपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हीस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 2,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 14 प्रकरणांची नोंद करून 19,500/- रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 30 प्रकरणांची नोंद करून 6,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 5 प्रकरणांची नोंद करून 5,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने धरमपेठ झोन अंतर्गत मे. फ्रुलाटो थिक शेकर्स यांनी दुकानातील कचरा जवळच्या रस्त्याच्या कडेला टाकल्याबद्दल रू. 5,000/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. धंतोली झोन अंतर्गत मे. अच्युतम एनक्लेव यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल रू. 10,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला.

गांधीबाग झोन अंतर्गत मे. राधिका स्वीट्स यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. 5,000/- हजार रुपयांचा दंड वसुल केला.

सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. कुलदीप ट्रेडर्स यांनी बांधकाम दरम्यान जड वाहनाने चेंबरचे नुकसान केल्याबद्दल रु. 5,000/- रुपयाचा दंड वसुल करण्यात आला. उपद्रव शोध पथकाने 4 प्रकरणांची नोंद करून रू. 25,000/- दंड वसूल केला.

# संपूर्ण महाराष्ट्रातील गोंड गोवारी जमातीचा विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

महाराष्ट्रातील संपूर्ण गोंड गोवारी जमातीच्या बांधव, भगिनींना विनम्रपणे सुचीत करण्यात येते की, कैलास राऊत यांनी आणलेल्या संदेशाप्रमाणे दि.१२/११/२०२४ रोजी आदिवासी गोंड गोवारी जमात संविधानिक हक्क संघर्ष कृती समिती, महाराष्ट्रचे संयोजक मंडळाची रात्री ९ वा. ते ११ वा पर्यंत झालेल्या गुगल मिट मध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे देवेंद्र फडणवीस यांच्या निमंत्रणावरून चर्चेकरिता न जाण्याचे एकमताने ठरविण्यात आले होते.

तरीही दि. १३/११/२४ ला सकाळी कैलास राऊत ह्यांनी देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री यांना भेटण्याची परस्पर तयारी केल्याची माहीती मिळताच त्यांना उपोषणकर्ते सचिन चचाने व मी रामदास नेवारे यांनी कॉन्फरन्सवर घेऊन चर्चा केली व उपमुख्यमंत्री साहेबांशी चर्चा करण्यास




जाण्यास मनाई केली होती. तरीही त्याला न जुमानता संघर्ष कृती समिती च्या निर्णयाविरुद्ध जावून कैलास राऊत हेमराज नेवारे साकोली,सुशील राऊत गोंदिया,अरुणा चचाने, श्रीमती सविता नेवारे, प्रतिभा बोरकर, रुख्मीनी सहारे सर्व अमरावती जिल्हा यांना सोबत घेऊन नागपूर येथे देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री यांना भेटले व आदिवासी गोंड गोवारी जमात संविधानिक हक्क संघर्ष कृती समितीच्या वतीने सुरू असलेला विधानसभा निवडणुकीवरील बहिष्कार आंदोलन बेकायदेशीरपणे मागे घेवून निवडणुकीमध्ये भारतीय जनता पाटीर्ला पाठिंबा जाहीर केला.

ही संघर्ष कृती समिती च्या ध्येयधोरणाविरूद्ध असल्याने दि.१६/११/२०२४ ला रात्री ९ ते १२ वा पर्यंत गुगल मिट आयोजीत करून वरील विषयावर सखोल विचारविनिमय करून मिटींगला जुळलेल्या १०० पदाधिकारी, जमात बांधवांनी एकमताने निर्णय घेवून वरील सर्व लोकांना संघर्ष कृती समिती पदावरून निष्कासीत करण्यात आले आहे. तसेच संघर्ष कृती समितीचे कार्यकारी संयोजक माधव कोहळे यांनी ही कृती समितीच्या ध्येयधोरणा विरूद्ध काम केल्याने त्यांना ही निष्कासीत करण्याचा निर्णय या सभेत पारीत करण्यात आला आहे. यापुढे वरील सर्व लोक कृती समितीच्या चळवळीला जबाबदार राहणार नाही. लेटरहेड वरून त्यांची नावे कमी करण्यात आली आहेत.

वरील लोकांनी बहिष्कार मागे घेतल्याच्या किंवा भारतीय जनता पार्टी ला विधानसभा निवडणुक पाठिंबा जाहीर करण्याचे घोषणेशी आदिवासी गोंड गोवारी जमात संविधानिक हक्क संघर्ष कृती समिती ,महाराष्ट्रचा कोणताही संबंध नाही.

दि. १३/१०/२०२४ ला आमदार निवास नागपूर येथे ११४ शहीद जमात बांधवांची शपथ घेवून घोषीत केलेला विधानसभा निवडणुकीवरील बहिष्कार कायम राहील. कोणत्याही परिस्थितीत बहिष्काराच्या भुमिकेत बदल करण्यात येणार नाही.

आपल्याच वंचित जमात बांधवांशी बेईमानी करणारे आता स्वतःची सफाई देण्याकरिता व जमात बांधवाना विचलीत करण्यासाठी अनेक आरोप प्रत्यारोप करतील, परंतु त्याला उत्तर प्रत्तयुत्तर देण्यात वेळ घालविण्यापेक्षा आपल्या टारगेट वर लक्ष केंद्रित करावे.

त्यावेळी पत्र परिषदेत माहिती देताना उपस्थित राज्य सदस्य सचिव रामदास नेवारे, कार्यकारी संयोजक गजानन कोहळे, अनिल राऊत, किशोर चौधरी, उपोषणकर्ते सचिन चचाने उपोषणकर्ते तथा इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

## दरोड्याच्या तयारीतील टोळीला अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

गुन्हे शाखा युनिट 3 च्या पथकाने गोपनिय माहितीवरून दरोड्याच्या तयारीत असलेल्या टोळीला अटक केली. गणेश बागडे (21), निकेश शाहू (23), मुबारक शाह (20), तिन्ही रा. कुंदनलाल गुप्तानगर, प्रकाश दरवाडे (23) आणि आदित्य डोंगरे (19) दोन्ही रा. बाबादीपसिंगनगर, अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. गणेश बागडे हा यशोधरानगर ठाण्यात नोंद घरफोडीच्या गुन्ह्यात फरार होता. पोलिसांनी आरोपींकडून शस्त्रास्त्र, दुचाकी व दागिन्यांसह एकूण 2,48,170 रुपयांचा माल जप्त केला आहे. शनिवारी रात्री 11.15 वाजताच्या सुमारास गुन्हे शाखेचे पथक कपिलनगर ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान बाबादिपसिंगनगर परिसरात बरगादी टेलर्सजवळील मोकळ्या जागेत काही इसम शस्त्रास्त्रासह काही तरी गुन्हा करण्याच्या तयारीत बसून असल्याची माहिती मिळाली. या माहितीवरून पोलिस पथकाने परिसरात सापळा रचून धाड टाकली असता वरील आरोपी मिळाले. पोलिसांना पाहताच आरोपींनी पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांना पकडण्यात आले. झडतीमध्ये आरोपींजवळ तलवार, लोखंडी कटवनी, लाकडी दांडा, दोरी, मिरची पावडर, 4 मोबाईल व एक दुचाकी वाहन मिळाले. पोलिसांनी सर्व माल जप्त करून आरोपींना अटक केली. त्यांच्याविरुद्ध कपिलनगर ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला. आरोपींचा अभिलेख तपासला असता गणेश बागडे नावाचा आरोपी हा यशोधरानगर ठाण्यात नोंद घरफोडीच्या गुन्ह्यात पाहिजे असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी त्याच्याकडून घरफोडीच्या गुन्ह्यातील 18 ग्रॅम सोन्याचे दागिनेही जप्त केले. पुढील कार्यवाहीसाठी सर्व आरोपींना मालासह कपिलनगर पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले आहे.

## गुन्हेगाराकडून पिस्तूल व काडतूस जप्त

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :

तहसील पोलिसांनी गस्तीदरम्यान संशयातून एका तरुणाला ताब्यात घेतले. झडतीमध्ये त्याच्याजवळ एक गावठी पिस्तूल आणि 2 जीवंत काडतूस मिळाले. शुभम महल्ले (30) रा. गणेशपेठ असे आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी शुभमला अटक करून त्याच्याकडून 2 काडतूस, पिस्तूल व दुचाकी असा एकूण 58 हजार रुपयांचा माल जप्त केला. न्यायालयाने त्याला एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने प्रत्येक पोलिस ठाण्यांतर्गत नाकाबंदी लावण्यात आली असून 24 तास पोलिसांची गस्त सुरू आहे. शनिवारी सायंकाळी 5.30 वाजताच्या सुमारास तहसील पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते.

या दरम्यान गार्ड लाईन परिसरात एक तरुण दुचाकीवर संशयास्पदरित्या बसलेला दिसला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन पंचासमोर झडती घेतली असता खिशात 2 जीवंत काडतूस व दुचाकीच्या डिक्कीमध्ये एक देशी बनावटीची पिस्तूल मिळाली. पोलिसांनी शुभमला अटक केली. त्याच्याविरुद्ध आर्म्स अ‍ॅक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

### मध्यप्रदेशाशी जुळताहेत तार

शुभम कार डेकोर आणि राखी बनविण्याचे काम करतो. एमडी तस्करीतही तो सक्रीय असल्याचा संशय आहे. त्याने पिस्तूल कुठून आणि कशासाठी आणली यासंदर्भात पोलिस सखोल चौकशी करीत आहेत. प्राथमिक तपासात मध्यप्रदेशात तार जुळत असल्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली. वर्षभरापूर्वी तहसील पोलिसांनी मोठ्याप्रमाणात पिस्तूल पकडल्या होत्या. त्याच्याशी शुभमचे संबध असल्याचाही अंदाज वर्तविण्यात येत आहे.

## शांतीनगर परिसरातून ३ गुंड तडीपार

**नागपूर :** आगामी विधानसभा निवडणुकी दरम्यान कोणतीही अप्रिय घटना होऊ नये म्हणून शांतीनगर परिसरातील 3 सराईत गुन्हेगारांना तडीपार करण्यात आले आहे. राहुल उर्फ बबल्या गोविंद बावणे (24) रा. प्रेमनगर झेंडा चौक, सिराजउल हाजी अब्दुल हक (50) रा. कचरा गल्ली आणि मोहम्मद उस्मान साबिर शेख (20) रा. दही बाजार अशी तडीपार करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. वरील तिन्ही आरोपींवर मारहाण, लोकांना धमकावणे, अवैधरित्या दारू विक्रीचे गुन्हे नोंद आहेत.

त्यांच्याकडून घातपात होण्याचा धोका होता. त्यामुळे शांतीनगरचे ठाणेदार विक्रांत सगणे यांनी निवडणुकीदरम्यान कायदा-सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी तिन्ही सराईत गुन्हेगारांना तडीपार करण्याचा प्रस्ताव तयार केला होता. झोन 3 च्या डीसीपी महक स्वामी यांनी प्रस्तावाला मंजुरी देत तिन्ही गुन्हेगारांना तडीपार करण्याचे आदेश दिले. तिघांनाही तीन महिन्यांसाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. या दरम्यान आरोपी शहरात दिसल्यास शांतीनगर पोलिस किंवा 112 वर माहिती देण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनिय ठेवले जाईल.

## मतदान केंद्रांवर आवश्यक सोयी करा
### भाजपाची जिल्हाधिकाऱ्यांना विनंती

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

मतदान केंद्रांवर मतदारांसाठी आवश्यक त्या सोयी ठेवा, अशी विनंती भारतीय जनता पार्टीने जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय प्रत्यक्ष भेट घेऊन एका निवेदनाद्वारे केली आहे.

पक्षाचे महानगर अध्यक्ष बंटी कुकडे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष संजय भेंडे, प्रवक्ते चंदन गोस्वामी, महानगर उपाध्यक्ष रमेश दलाल, महामंत्री राम अंबुलकर, अश्विनी जिचकार, डॉ. दयाशंकर विद्यालंकार पत्रकार परिषदेला उपस्थित होते. बंटी कुकडे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीच्या दिवशी अनेक मतदान केंद्रांवर पिण्याच्या पाण्याची, खुर्च्या, सावलीसाठी अनेक ठिकाणी शेड नव्हते. बूथवरील मतदार यादी व प्रत्यक्ष केंद्रातील मतदार यादी यात बरीच तफावत होती. बूथवरील यादीतील नावे मतदान केंद्रातील यादीत नव्हती. अनुक्रमांक बदले




होते. खोली क्रमांक बदलले होते. मतदान केंद्राच्या यादीतील नावे बूथवरील यादीत नव्हती. सुमारे १ लाख ९४ नावे मतदार यादीतून कापण्यात आली होती. ३७ हजार नावांवर डिलिटचा शिक्का होता. लाखो लोकांना मतदान केंद्रांवरून मतदान न करताच परतावे लागले. यंदा असे होऊ नये. सर्व मतदार तसेच ज्येष्ठ नागरिक, वृद्ध, दिव्यांग मतदारांना गैरसोय होऊ नये, याची काळजी घ्यावी. व्हिल चेअर, रॅम्प असावे. पिण्याच्या पाणी, खुर्च्या, सावलीसाठी शेड असावे. प्रक्रिया संथपणे करू नका. १०० टक्के मतदान होण्यासाठी हे आवश्यक आहे, हे जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले.

मतदान हा अधिकार आहे. सकाळीच केंद्रावर जाऊन मतदान करा. भाजपाने अनेक विकास कामे केली असून भाजपा उमेदवारांना मतदान करून पुन्हा एकदा विकास करण्याची संधी द्या, असे आवाहन संजय भेंडे व बंटी कुकडे यांनी केले.

## जिल्ह्यातील ७ संस्थांच्या ८ सोयाबीन खरेदी केंद्रांना मान्यता

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

हंगाम २०२४-२५ मध्ये केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभुत दरानुसार नाफेड/एनसीसीएफमार्फत सोयाबीन खरेदी करीता ऑनलाई न शेतकरी नोंदणी 1 ऑक्टोबर पासून सुरु करण्यात आली असून प्रत्यक्ष सोयाबीन पिंकाची खरेदी प्रक्रिया 15 ऑक्टोबरपासून सुरु करण्यात आली आहे. या अनुषंगाने नागपूर जिल्ह्यात 7 संस्थाच्या 8 खरेदी केंद्राना मान्यता देण्यात आली आहे.

भिवापूर तालुका खरेदी विक्री संस्था भिवापूर, कळमेश्वर तालुका- खरेदी विक्री संस्था कळमेश्वर, काटोल तालुका- तालुका खरेदी विक्री संस्था काटोल, कुही तालुका- तालुका खरेदी विक्री संस्था उमरेड केंद्र कुही, नरखेड तालुका- तालुका खरेदी विक्री संस्था नरखेड, रामटेक तालुका- तालुका खरेदी विक्री संस्था रामटेक, सावनेर तालुका- तालुका खरेदी विक्री संस्था सावनेर, उमरेड तालुका- तालुका खरेदी विक्री संस्था उमरेड असे आहे. 8 सोयाबीन खरेदी केंद्रांना शेतकरी नोंदणीकरीता मंजुरी मिळाली आहे. जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी जवळच्या नमुद खरेदी केंद्रावर जाऊन शेतकरी नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याकरीता स्वतःचे आधारकार्ड, मोबाईल क्रमांक, चालु हंगामातील पीक पेरा नमुद सातबारा, नमुना आठ-अ, सामाईक सातबारा क्षेत्र असल्यास सर्वांचे आधारकार्ड सह संमती पत्र, अद्यावत बँक पासबुक झेरॉक्स इत्यादी कागदपत्रासह नोंदणीसाठी अर्ज करावा तसेच हमीभाव खरेदी केंद्रावर सोयाबीन विक्रीकरीता आणण्यापूर्वी व्यवस्थित वाळवून त्यामध्ये आद्रतेचे प्रमाणे हे 12 टक्के पेक्षा कमी असल्याचे व एफएक्यु दर्जाचे सोयाबीन असल्याची खात्री करावी. त्यासाठी आपण आपल्या सोयाबीनचे नमूने खरेदी केंद्रावर आणून त्यातील आद्रता तपासावी. आद्रता ही 12 टक्के पेक्षा कमी असल्यास आपले सोयाबीन खरेदी केंद्रावर विक्रीसाठी आणावे जेणे करुन जास्त आद्रतेमुळे आपले सोयाबीन परत नेण्याची वेळ येणार नाही. याबाबत शेतकऱ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी अजय बिसने यांनी केले.

## हावरापेठ मंदिरात त्रिपूरी पौर्णिमा संपन्न

**नागपूर :** गणपती हनुमान मंदिर हावरापेठ येथे मागील ३७ वर्षांपासून पारंपरिक पद्धतीने काकड आरती व त्रिपुर दहन उत्सव साजरा होत असतो.त्रिपूरी पौर्णिमेला पहाटे रामधुन दिंडी काढण्यात आली,दुपारी भजन सायंकाळी हरिपाठ,तुळशी विवाह,भजन संध्या,रात्री १२ वाजता काकड्याचे अभंग गात त्रिपुर जाळण्यात आले. आरती गोपाल काला प्रसादाचे वितरण करण्यात आले. ह.भ.प.कृष्णराव सरोदे महाराज व मृदुंग वादक मंगेश धोटे यांचे शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देवून माजी नगरसेवक बांते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संचालन रमेश मेहर यांनी केले तर आभार राजू इटनकर यांनी मानले. राष्ट्रवंदनाने कार्यक्रमाचे समारोप करण्यात आले.

## आपले एक मत अमूल्य, मतदान अवश्य करा : डॉ. अभिजीत चौधरी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

मतदान हा आपल्याला लोकशाहीमध्ये मिळालेला महत्वाचा अधिकार आहे. लोकशाहीत प्रत्येक मताला सारखे महत्व आहे. आपले एक मत अमूल्य आहे त्यामुळे मतदान अवश्य करा, असे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले आहे.

येत्या बुधवारी २० नोव्हेंबर २०२४ रोजी राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान आहे. नागपूर शहरात होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर मनपा आयुक्तांनी नागरिकांना मतदानाचे आवाहन



केले आहे. २० नोव्हेंबर रोजी शहरातील सर्व मतदारांनी मोठ्या संख्येत आपल्या मतदान केंद्रावर जाऊन मतदान करावे. आपल्या देशात, राज्यात लोकशाही बळकट करण्यासाठी आपले एक मत अत्यंत अमूल्य आहे, त्यामुळे प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क अवश्य बजावावा, असेही आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले आहे. २० नोव्हेंबरला सर्व मतदान केंद्रांवर प्रशासनामार्फत सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत. मतदाराला आपले मतदान केंद्र कुठे आहे हे माहित करून घेण्यासाठी वोटर हेल्पलाईन ॲप डाउनलोड करून त्यावरून ते शोधता येईल. या सर्व निवडणुकीसाठी आपण सर्वांनी लाभ घ्यावा व मतदानाचा हक्क बजावावा. सर्वांच्या पुढाकारामुळे नागपूर शहरातील मतदानाची टक्केवारी नक्की वाढेल, असा विश्वास मनपाच्या अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल व अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर यांनी व्यक्त केला.

## २१ वर्षापासून फरार महिलेस अटक

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

फसवणुकीच्या प्रकरणात गत 21 वर्षांपासून फरार महिला आरोपीला सदर पोलिसांनी अटक केली आहे. ती पोलिसांपासून वाचण्यासाठी नाव व पत्ते बदलून रहात होती. पुष्पा मुतन्ना पुल्लीवार (50) रा. मोहननगर असे अटकेतील महिलेचे नाव आहे.

2002 साली सदर पोलिसांनी पुष्पा आणि तिचा साथीदार आशिष द्विवेदी रा. लोधीपुरा, बजेरियाविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदविला होता. दोघांनीही नोकरी लावून देण्याच्या नावावर अनेकांकडून पैसे घेतले होते. पीडितांच्या तक्रारीनंतर पोलिसात गुन्हा दाखल झाला. तत्कालीन तपास अधिकाऱ्यांनी दोन्ही आरोपींना अटक केली. न्यायालयातून जामीन मिळाल्यानंतर दोन्ही आरोपी फरार झाले. तपास अधिकाऱ्याने न्यायालयात आरोपपत्रही दाखल केले, मात्र जामीन मिळाल्यानंतर आरोपी कधी न्यायालयात हजरच झाले नाही. न्यायालयात सतत गैरहजर रहात असल्याने दोघांनाही कलम 82 अंतर्गत फरार घोषित करण्यात आले होते. पोलिसांपासून वाचण्यासाठी आरोपी सतत आपले राहण्याचे ठिकाण आणि नाव बदलून रहात होते. वपोनि मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनात पोहवा नरेंद्र कलनायके, श्रीकृष्ण शेरकी, रणजीत दानेकर आणि उज्ज्वला राठोड सतत सरकारी आणि निमसरकारी कार्यालयांमध्ये जाऊन आरोपींबाबत माहिती गोळा करीत होते. सोमवारी पोलिसांना माहिती मिळाली की, पुष्पा कोणाला तरी भेटण्यासाठी गड्डीगोदाम परिसरात आली आहे. तत्काळ पोलिस पथकाने तिला पकडण्यासाठी परिसरात सापळा रचला.

## आरपीएफ नागपूर विभागाने मानव तस्करीमधून ९ अल्पवयीन मुलांचा केला बचाव

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

जागरूकता आणि समर्पणाचे एक अप्रतिम उदाहरण दाखवत, रेल्वे सुरक्षा बल, नागपूर विभागाने नागपूर रेल्वे स्थानकावर मानव तस्करीच्या एका नेटवर्कमधून ९ अल्पवयीन मुलांची यशस्वीपणे बचाव केला. या बचाव मोहिमेने फ्ढऋच्या असुरक्षित आणि कमजोर व्यक्तींच्या जीवनाची रक्षा आणि न्याय सुनिश्चित करण्याच्या कटिबद्धतेला समर्पित केले.

वेळीच मिळालेल्या टिप आणि उउळश च्या रिअल-टाइम निरीक्षणाच्या आधारे, आरपीएफ नागपूर, क्राईम प्रिव्हेंशन अँड डिटेक्शन स्क्वॉड आणि सेंट्रल इंटेलिजन्स ब्युरो यांच्या संयुक्त प्रयत्नांनी तस्करीच्या प्रयत्नाला हाणले. नागपूरचे उप निरीक्षक होटीलाल मीणा यांनी साधारणतः ११:०० वाजता ढफर काउंटरजवळ अल्पवयीन मुलांचे संशयास्पद कृत्य निगराणी दरम्यान ओळखले. RPF टीमच्या तत्पर आणि समन्वित प्रतिसादामुळे, ज्यात प्रधान



हेड कॉन्स्टेबल कम सिंग ठाकूर, कॉन्स्टेबल नीरज कुमार, अरक मनोज पांडे, LCT दीपा कैथवास, LHC वीना सोरेन आणि इतरांचा समावेश होता, एक संशयित तस्कर अटक करण्यात आला आणि अल्पवयीन मुलांची सुरक्षितपणे बचाव करण्यात आली.

बचाव केलेल्या मुलांमध्ये १२ ते १८ वर्षे वयाच्या ९ मुलांचा समावेश होता, जे बिहारच्या भोजपूर आणि बक्सर जिल्ह्यातील होते. प्राथमिक तपासात हे समोर आले की त्यांना पैसे आणि नागपूरमधील खासगी कंपन्यांमध्ये हलके काम करण्याचे आमिष दाखवले होते. त्यानंतर मुलांचा वैद्यकीय तपासणी करण्यात आला आणि त्यांना एका सरकारी आश्रयगृहात सुरक्षितपणे हलवले गेले. त्यांच्या कुटुंबांना सूचित करण्यात आले आणि त्यांच्या भल्यासाठी फोनवर संपर्क साधला गेला. संशयित तस्कर GRP नागपूर कडे सोपवण्यात आले आहेत, ज्यांनी संबंधित कलमांखाली, ज्यात बाल न्याय अधिनियम आणि बाल श्रम अधिनियम समाविष्ट आहेत, एक गुन्हा नोंदवला आहे. या ऑपरेशनमध्ये चाइल्डलाइन आणि जिल्हा सुरक्षा अधिकारी यांच्यासोबतही सहकार्य करण्यात आले आहे, जेणेकरून बचाव केलेल्या मुलांची सुरक्षा, भलाइ सुनिश्चित केली जाऊ शकेल.

## निवडणूकीचा प्रचार करणारी पोस्ट टाकल्यास कारवाई होईल : जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीचा प्रचारतोफा सोमवारी (१९ नोव्हेंबर) संध्याकाळी ६ वाजता थंडावणार आहे. त्यानंतर समाजमाध्यमांवर निवडणूकीचा प्रचार करणारी पोस्ट टाकल्यास संबंधितांवर कडक कारवाई केली जाईल, अशी माहिती नागपुरचे जिल्हाधिकारी व निवडणूक अधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिली.

नागपुरातील नियोजन भवनमध्ये सोमवारी झालेल्या पत्रपरिषदेत ते बोलत होते. प्रचाराच्या मुदतीनंतर कोणत्याही उमेदवाराला वयक्तिक, पक्षातर्फे वा समाज माध्यमाद्वारे प्रचार करता येत नाही. परंतु कुणी प्रचार करतांना आढळल्यास दोषींवर नियमानुसार कडक कारवाई केली जाईल. प्रशासनाची नागपूर जिल्ह्यातील सगळ्याच संवेदनशिल व असंवेदनशिल भागांवर नजर आहे.

जिल्ह्यातील सगळ्याच मतदारसंघांमध्ये पोलीस यंत्रणासह विविध यंत्रणेच्या माध्यमातून लहान- मोठ्या सर्वच घडामोडींवरही लक्ष ठेवली जाईल. या काळात उमेदवारांना प्रचारासाठी लहान- सहान बैठकीही घेता येत नाही. परंतु बैठक घेतल्याचे स्पष्ट झाल्यास दोषींवर कारवाई केली जाईल. प्रशासनाकडून राज्याच्या सिमेवरील तपासणी नाक्यांवर गस्त वाढवण्यासह सुरक्षा यंत्रणेकडून संशयास्पद वाहनांची तपासणी सुरू आहे.

मंगळवारी (१९ नोव्हेंबर) सकाळपासून जिल्ह्यातील विविध मतदान केंद्रांवर ईव्हीएमसह इतरही निवडणूकीशी संबंधित यंत्रणा पाठवली जाणार आहे. त्याबाबतची तयारी पूर्ण झाली आहे. सोबत अधिकारी, उमेदवारांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेऊन आवश्यक माहिती दिली गेली आहे.

त्यातच यंदाच्या निवडणूक कामात लावलेल्या सुमारे २० हजार अधिकारी- कर्मचाऱ्यांना जीपीएसद्वारे जोडले गेले आहे.

त्यामुळे या सगळ्यांवर या तंत्रज्ञानाद्वारे लक्ष ठेवले जाणार असल्याचेही डॉ. इटनकर यांनी सांगितले. २० तारखेला निवडणूक असून मतदानानंतर सर्व ईव्हीएम व साहित्य सुरक्षीत ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणेच्या नजरेत ठेवले जाईल. २३ तारखेला मत मोजनीचीही सोय असल्याचे डॉ. विपीन इटनकर म्हणाले.

नागपूर व रामटेक लोकसभा मतदारसंघातील निवडणूकीत काही ठिकाणा ईव्हीएम यंत्रात तांत्रिक बिघाडाच्या घटना घडल्या होत्या. त्याला दुरूस्तीला बराच वेळ लागल्याचा आरोप झाला होता. त्यावर जिल्हाधिकारी डॉ. इटनकर म्हणाले, यंदा ईव्हीएममध्ये बिघाडाची माहिती मिळताच १० मिनटांत तेथे चमू पोहचून दुरूस्तीचे काम सुरू होईल. त्यामुळे यंदा समस्या उद्भवणार नाही.

नागपूर जिल्ह्यात यंदाच्या निवडणूक काळात सोने, चांदी, रेशन किट, रोख, मद्यासह इतर अशा सुमारे ४० कोटी रुपयांचा मुद्देमाल प्रशासनाकडून जप्त करण्यात आला आहे. मागील लोकसभा निवडणूकीच्या तुलनेत ही संख्या सुमारे ४०० पट असल्याचा दावाही जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी केला.